www.yuvakadhar.in

E mail - dainikyuvakaadhar@gmail.com

facebook : yuvakadhar

दैनिक

तरुणांचा बुलंद आवाज

# युवक आधार

मराठी




मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : २९ मंगळवार दि. ०७ ऑक्टोबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# राज्यातील नगराध्यक्षपदाच्या आरक्षणाची घोषणा !

**दैनिक युवक आधार**

**संपादक संतोष आमले**

**मुंबई :** राज्यातील २४७ नगरपालिका आणि १४७ नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदाचे आरक्षण सोडत जाहीर झाली आहे. मंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षते खाली सोडत झाली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता, महाराष्ट्रातील २४७महानगरपालिका आणि १४७ नगरपंचायतींमध्ये नगराध्यक्ष पदाचे आरक्षण आज सोमवारी जाहीर करण्यात आले आहे. मंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली नगराध्यपदाच्या आरक्षणाची सोडत काढण्यात आली.यावेळी सरकारी पक्षाचे अधिकारीही उपस्थित होते. दरम्यान, ३३ नगरपरिषदापैकी १७ नगरपरिषदांसाठी अनुसूचित जाती महिलांसाठी आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. मागच्या काही दिवसापूर्वी सुप्रीम कोर्टानेजानेवारी महिना संपण्याच्या आधी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश राज्य सरकारला दिले होते. त्यानंतर प्रशासनाने वेगाने तयारी सुरू केली. सोमवारी मंत्रालयाच्या सहत्य मजल्यावरील कौन्सिल हॉलमध्ये मंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली नगराध्यक्षपदाच्या आरक्षणाची सोडत काढण्यात आली.यावेळी राजकीय पक्षाचे पदाधिकारी देखील उपस्थित होते. राज्यातील ६७ नगर परिषदांच्या अध्यक्षपद ओबीसींसाठी जाहीर झाले आहे 67 नगरपरिषदपैकी 34 ओबीसी महिलासाठी आरक्षित करण्यात आले.एकूण ७४ जागा राखीव आहेत, यामधील सर्वसाधारण महिलांसाठी ३८ जागा अनुसूचित जातीसाठी तर ७ जागा अनुसूचित जमातीसाठी तसेच २० जागा मागास प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

**या नगरपरिषदांसाठी ओबीसीसाठी आरक्षित**

तिरोडा, वाशिम, धामणगाव, भोकरदन, भद्रावती, परांडा, भगूर, मालवण, नंदुरबा खापा, वरोरा, हिंगोली, मोर्शी, शहादा, उमरेड, नवापूर, त्र्यंबक, कोपरगाव, हिवरखेड, बाळापूर, शिरूर, कुळगाव, बदलापूर), मंगळूरपीर, कन्हान पिंपरी, पाथर्डी, देगलूर, नेर नबाबपूर, धाराशिव, इगतपुरी, रामटेक, माजलगाव, नाशिराबाग, पालघर, मूल, वरणगाव, बल्हारपूर, मलकापूर




(बुलढाणा), इस्लामपूर, जुन्नर, कुरडुवाडी, मोहपा, तुमसर, औस, महाड, मुरुड जंजिरा, अकोट, चोपडा, सटणा, काटोल, गोंदिया सांगोला, दौंड, राहता, श्रीवर्धन, रोहा, ब्रम्हपुरी, देसाईगंज, येवला, कुलगाव, कर्जत, दौंडाईचा वरवडे, कंधार, शिरपूर वरवडे.

**३३ नगरपरिषदापैकी १७ नगरपरिषदासाठी अनुसूचित जाती महिला आरक्षण जाहीर**

देऊळगावराजा - महिला प्रवर्ग आरक्षित मोहोळ - महिला प्रवर्ग आरक्षित तेल्हारा - महिला प्रवर्ग आरक्षित ओझर - महिला प्रवर्ग आरक्षित वानाडोंगरी - महिला प्रवर्ग आरक्षित भुसावळ - महिला प्रवर्ग आरक्षित घुग्गूस - महिला प्रवर्ग आरक्षित चिमूर - महिला प्रवर्ग आरक्षित शिर्डी महिला प्रवर्ग आरक्षित सावदा- महिला प्रवर्ग आरक्षित मैनदर्गी महिला प्रवर्ग आरक्षित दिगडोहदेवी -महिला प्रवर्ग आरक्षित दिग्रस- महिला प्रवर्ग आरक्षित अकलूज -महिला प्रवर्ग आरक्षित बीड महिला प्रवर्ग आरक्षित शिरोळ -महिला प्रवर्ग आरक्षित

**६७ नगरपरिषदपैकी ३४ ओबीसी महिलासाठी आरक्षित**

भगूर - ओबीसी महिला इगतपुरी ओबीसी महिला विटा -ओबीसी महिला बल्हारपूर ओबीसी महिला धाराशिव -ओबीसी महिला भोकरदन ओबीसी महिला जुन्नर - ओबीसी महिला उमरेड - ओबीसी महिला दौडं ओबीसी महिला कुळगाव बदलापूर ओबीसी महिला हिंगोली - ओबीसी महिला फुलगाव - ओबीसी महिला मुरुड जंजीरा - ओबीसी महिला शिरूर - ओबीसी महिला काटोल- ओबीसी महिला माजलगाव - ओबीसी महिला मूल ओबीसी महिला मालवण - ओबीसी महिला देसाईगंज - ओबीसी महिला हिवरखेड - ओबीसी महिला अकोट - ओबीसी महिला मोर्शी - ओबीसी महिला नेर- नवाबपूर ओबीसी महिला औसा - ओबीसी महिला कर्जत ओबीसी महिला देगलूर ओबीसी महिला चोपडा ओबीसी महिला सटाणा- ओबीसी महिला दोंडाईचा वरवडे ओबीसी महिला बाळापूर - ओबीसी महिला रोहा - ओबीसी महिला कुरडुवादी ओबीसी महिला धामणगावरेल्वे ओबीसी महिला वरोरा - ओबीसी महिला

**खुला महिला प्रवर्ग नागपरिषदेची सोडत जाहीर**

परळी वैजनाथ मुखेड आंबरनाथ अचलपूर मुदखेड पवनी कन्नड मलकापूर

**३८ महिला खुला**

मोहाडी बार्शीटाकळी वाशी महाळुंग श्रीपूर नांदगाव खंडेश्वर गुहाघर राळेगाव लाखांदूर वैराग सोयगाव महादुला अनगर नागनाथ लाखनी रेणापूर नातेपुते म्हसळा सडक अर्जुनी दिंडोरी जळकोट मेढा लोणंद वाडा देवरुख लांजा सिंदखेडा मावळ पारशिवनी शहापूर देहू कुही मुक्ताईनगर बाभुळगाव

# प्रा.डॉ.जयपाल पाटील यांना "विद्या वाचस्पती सारस्वत सन्मान"अंतर्गत ऑननरी डॉक्टरेट जाहीर

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील**

अलिबाग-येथील जगप्रसिद्ध आपत्तीव्यवस्थापन तज्ञ,समाजसेवक प्रा. डॉ.जयपाल पाटील यांना त्याच्या अफाट समाजसेवे बद्दल पं. दीनदयाळ उपाध्याय हिन्दी विद्यापीठ वृंदावन धाम मथुरा उत्तर प्रदेश यांनी शाळा,महाविद्यालयातील विद्यार्थीना आपत्तीव्यवस्थापनचे प्रशिक्षण दिल्याने त्यांना"विद्या वाचस्पती सारस्वत सन्मान " ऑननरी डॉक्टरेट देण्याचे पत्र प्रबंधक यानीं दिनांक4/10/25रोजी पाठविले आहे

यापुर्वी त्यांना छत्रपती शिवाजीमहाराज लोक विद्यापीठ अमरावतीयांनी "शेतकरी,समाजसेवा" वर ऑनररी डॉक्टरेट प्रदान केली होती.प्रा.जयपाल पाटील हे आपत्तीव्यवस्थापनचे प्रशिक्षण संपुर्ण भारतात शाळा,महाविद्यालय ,कारखाने आणी रायगड



जिल्हा परिषद च्या ग्रामपंचायत मधे देतात. असे त्यानी देशभरात लाखो नागरिकांना प्रशिक्षण दिले आहे व देत आहेत.विद्यापीठाने देशभरातीलसमाजातील विविध घटकात सेवा करणारे नागरिक त्याचा कडुन प्रस्ताव मागितले होते.त्या मधे प्रा.जयपाल पाटील यांची आपत्तीव्यवस्थापन व समाजसेवा पाहून विदयापिठाचे कारीणीत विचार होऊन त्यांना ऑनररी डॉक्टरेट जाहीर करण्यात आली आहे.

रायगडात 2चक्रीवादळे आली त्या वरील प्रबंध "आपत्ती मित्र" या नावाने सादर केला आहे.रविवार दिनांक 26/10/2025 रोजी दिल्लीत होणाऱ्या पंचतारांकित हॉटेल मधील कार्यक्रमात "विद्या वाचस्पती सारस्वत सन्मान " ऑननरी डॉक्टरेट मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे.पंडीत दीन दयाळ उपाध्याय हिंदी विद्यापीठ वृंदावन धाम मथुरा उत्तर प्रदेश चे असुन याला उत्तर प्रदेश सरकार, भारत सरकारचे निती आयोग,भारत सरकार ची एम.एस.एम.ई.,आई.एस.ओ.9001-2015 ची मान्यता प्राप्त विद्यापीठ आहे.

# पनवेल ते पंढरपूर रेल्वे सेवा सुरु करावी : निलेश सोनावणे रिपाई पनवेल शहर अध्यक्ष

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी**

पंढरपूरचे विठ्ठल रुक्मिणी मंदिर हे कोट्यवधी भाविकांचे दैवत आहे , महाराष्ट्रातील या महत्त्वपूर्ण धार्मिक स्थळाला 'दक्षिण काशी' म्हणूनही ओळखले जाते. पंढरपूरचे विठ्ठल मंदिर हे महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे इष्ट दैवत आहे. पनवेल मधून लाखो भाविक पंढरपूर येथे विठ्ठल रुक्मिणी च्या चरणी नतमस्तक व्हायला जातात . त्यामुळे पनवेल ते पंढरपूर अशी रेल्वे सेवा सुरु केल्यास रेल्वे विभागाच्या महसुलात तर वाढ होईलच शिवाय आमच्या पनवेल रायगड ,नवी मुंबई च्या जनतेस पंढरपूरच्या विठ्ठल रुक्मिणी च्या दर्शनास जाण्यासाठी सुलभ प्रवास होईल याकरिता पनवेल ते



पंढरपूर रेल्वे सेवा सुरू करण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे पनवेल शहर अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी रेल्वे विभागाकडे केली आहे .

आषाढी, कार्तिकी, माघी आणि चैत्र एकादशी या एकादशीला देशाच्या विविध भागांतून लाखो भाविक विठ्लाच्या दर्शनासाठी जात असतात त्याच प्रमाणे काही भाविक दर आठवड्याला दर्शनासाठी जातात,विठ्ठलाच्या भाविकांना आठवड्यातून किमान दोन वेळा तरी रेल्वे पनवेल ते पंढरपूर रेल्वे सेवा सुरु केल्यास दर्शनासाठी सुलभ रित्या जात येईल याकरिता पनवेल ते पंढरपूर रेल्वे सुरु करावी अशी मागणी रिपाई पनवेल शहर अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले ,केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनीजी वैष्णव , रेल्वे विभागाच्या वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे केली आहे

# लोकनेते दि. बा. पाटील साहेबांचा वसा पुढे नेत विकासकामे चालूच राहतील – लोकनेते रामशेठ ठाकूर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी )**

लोकनेते दि.बा. पाटील साहेबांनी दिलेला वासरा आपल्याला पुढे चालवायचा आहे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शिवाजीनगर येथे विविध विकास कामांच्या शुभारंभावेळी केले.

दानशूर व्यक्तीमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नागरीकांना भेडसवण्यासा समस्या मार्गी लावावल्यात यासाठी नेहमीच पुढाकार घेत अनेक विकासाची कामे केली आहेत. त्यानुसार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या स्वनिधीतुन पनवेल तालुक्यातील शिवाजीनगर गावातील रस्त्याचे काँक्रिटीकरण, अंतर्गत आर.सी. सी. गटार आणि नविन पिण्याच्या पाण्याची लाईन टाकण्यात आली आहे. या सर्व कामांचे उद्घाटन आणि शिवाजीनगर गावाची बांधण्यात येणाऱ्या कमानीचे भुमीपूजन भारतीय जनता पार्टीचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आज (दि. ०६) झाले.

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, लोकनेते दि. बा. पाटील आणि स्वर्गीय जनार्दन भगत साहेबांनी दिलेल्या संस्कारातून आम्ही घडलो आणि मोठे झालो. त्यांनीच आम्हाला चांगले कार्य करण्याच्या सवयी लावल्या असल्याचे सांगून त्यांनी जे आंदोलनाचे बीज रोवले ते आम्ही अजूनही चालु ठेवलं आहे असे प्रतिपादन केले. तसेच ज्या प्रकारची विकासाची कामे आत्ता पर्यंत झाली तशीच कामे येणाऱ्या काळातही करत राहणार अशी ग्वाही दिली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, गव्हाण परिसरामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नेते या भुमीकेतून अनेक विकास कामे केली. जिथे सरकारचा निधी उपलब्ध होऊ शकत नाही त्या ठिकाणी ठिकाणी लोकनेते रामशेठ ठाकूर साहेबांनी पुढाकार घेऊन विभागाचा विकास केला.

आपल्या परिसरामधील सर्व शाळा चांगल्या दर्जाच्या असल्या पाहिजेत त्याठिकाणी चांगले शिक्षण मिळाले पाहजे यासाठी आवश्यक ती




ताकद लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी लावली आहे. जे आपण करून ते चांगले आणि उत्तम झाले पाहिजे ही भावना त्यांनी ठेवली आहे. आणि हे करत असताना आपल्या गावचा विसर कधीही पडू दिला नाही त्यामुळे आपल्या परिसरामध्ये विकास कामे झाली पहिजे आपल्या परसिरातील समस्या मार्गी लागली पाहिजेत यासाठी सातत्याने ते दक्ष असतात, असेही त्यांनी यावेळी नमूद केले. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी, लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे दातृत्व खूप मोठे असून आपण भाग्यवान आहोत की त्यांच्या सारखे नेतृत्व आपल्याला लाभले आहे, असे गौरवोद्गार काढले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे ज्येष्ठनेते व माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय टी देशमुख, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, पंचायत समितीचे माजी सदस्य भाऊशेठ पाटील, शिवाजीनगर अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, हेमंत ठाकूर, सचिन घरत, रतन भगत, विश्वनाथ कोळी, वसंतशेठ पाटील, जयवंत देशमुख, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, सागर ठाकूर, सी एल ठाकूर, सुधीर ठाकूर, मीनाक्षी पाटील, रमाकांत म्हात्रे, राजकिरण कोळी, नंदा ठाकूर, शशिकांत ठाकूर, सागर ठाकूर, कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत, नरेश मोकळ, गव्हाण ग्रामपंचायत प्रशासक महेश घबाडी, विजय कुमार राठोड, गजानन ठाकूर, विजय ठाकूर, सुजित ठाकूर, किशोर ठाकूर, धनंजय ठाकूर, किशोर पाटील, शनिदास ठाकूर, श्रीराम ठाकूर, शशिकांत ठाकूर, चिंतामण ठाकूर यांच्यासह पंच कमिटी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# सिकेटी च्या 'एनएसएस' तर्फे ग्रामस्वच्छता अभियान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना युनिटच्या वतीने संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त ग्राम स्वच्छता अभियानचा शुभारंभ आज (दि. ०६ ) लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जन्म गावापासून अर्थात न्हावाखाडी येथून सुरू झाला.

सर्व प्रथम म्हसेश्वर मंदिरात विद्यार्थ्यांच्या प्रार्थना व स्वागत गीताने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. यावेळी न्हावेखाडी ग्रामपंचायत सरपंच विजेंद्र पाटील, माजी उपसरपंच जितेंद्र म्हात्रे, म्हसेश्वर मंदिर अध्यक्ष सी.एल.ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य सागर ठाकूर, नरेश मोकल ,प्रकाश कडू, मीनाक्षी पाटील ,रंजना पाटील, ललिता ठाकूर, सुनिता भोईर, सदाशिव ठाकूर ,सुरेश ठाकूर, वैभव म्हात्रे ,राजेश ठाकूर अशोक मोकल, सिकेटी ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रशांत मोरे, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, पर्यवेक्षक अजित सोनवणे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या ३१ विद्यार्थिनी व १६ विद्यार्थी स्वयंसेवकांनी न्हावाखाडी परिसरात तसेच रायगड जिल्हा परिषद मॉन्टेसरी व प्राथमिक शाळेत साफसफाई करण्याचे काम केले . सर्व विद्यार्थ्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जन्मघरास भेट दिली तसेच त्यांच्या जन्मघराविषयी व त्यांच्या प्राथमिक शिक्षणाविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. दुपार सत्रात लोकनेते रामशेठ ठाकूर व संस्थेचे उपकार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख यांनी राष्ट्रीय सेवा योजना ग्राम स्वच्छता अभियानाला भेट दिली. यावेळी कार्यक्रम अधिकारी निखिलेश देशमुख यांनी प्रास्ताविकातून राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्देश कथन केला आणि साहेबांच्या कार्याची थोरवी मांडली. सदर कार्यक्रमात दिशा बोरसे ( बारावी कला) व स्नेहा शिंदे(माजी




विद्यार्थिनी) यांनी आजच्या ग्राम स्वच्छता अभियानाचे कार्य व महत्त्व स्पष्ट केले. स्नेहा शिंदे या विद्यार्थिनीने आपल्या मनोगत आतून विद्यार्थ्यांना चांगले कार्य करण्याची प्रेरणा दिली. प्राचार्य प्रशांत मोरे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन तिचा सन्मान करण्यात आला. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कुठलेही सामाजिक कार्य करताना संघटन शक्ती व एकीचे बळ किती महत्त्वाचे असते हे उदाहरणाद्वारे स्पष्ट केले. प्रत्येक विद्यार्थ्याने या सामाजिक कार्यात सहभागी झाले पाहिजे, निरंतर अभ्यास केला पाहिजे व समाजाला काही ना काही देण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच उपकार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख यांनी राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे काय? विद्यार्थ्यांनी कसे काम केले पाहिजे ?आणि रामबागची निर्मिती कशी केली ? याचे सोप्या शब्दात विवेचन केले . या कार्यक्रमात न्हावेखाडी विभागातील जनार्दन ठाकूर, मंजुळा म्हात्रे, जानुबाई ठाकूर, बाबीबाई म्हात्रे, या स्वच्छता दूतांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सदर कार्यक्रम दोन टप्प्यांत झाला असल्याने पूर्वार्धात सहशिक्षिका उजमा कच्छी यांनी तर उत्तरार्धात प्राचार्य प्रशांत मोरे यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

# शिवणसई राजिप शाळेला दोन संगणक, दोन प्रिंटर भेट

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर**

ग्रामपंचायत सदस्य विश्वास पाटील यांच्या शब्दरूपी पाठपुराव्याला यश आले असून शिवणसई राजिप शाळेला दोन संगणक आणि दोन प्रिंटर भेट म्हणून मिळाले आहेत.कीर्ती महाविद्यालय दादर मुंबई यांच्या माध्यमातून शाळेतील विद्यार्थ्यांसाठी संगणक आणि प्रिंटर भेट म्हणून देण्यात आले आहेत. यावेळी महाविद्यालयाचे



प्राचार्य प्राध्यापक डॉक्टर अनिल मार्कंडेय, दत्तात्रय पाटील, अंकुश दळवी, मंदार खानविलकर, नभेश पांचाळ, निमेश कुंडे यांच्यासह रायगड जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका प्रतिभा नाईकवडे, सुवर्णा कांबळे, उज्वला पाटील उपस्थित होते.

# पूरग्रस्तांना दिला धीर — मा.जिल्हा परिषद सदस्य पुष्पाताई काळे यांचा दौरा

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव:-** छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या सदस्य तसेच भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या जिल्हा अध्यक्षा सौ.पुष्पाताई प्रकाश काळे यांनी आज सोयगाव तालुक्यातील आमखेडा गटातील पूरग्रस्त भागांचा दौरा करून शेतकऱ्यांना व ग्रामस्थांना धीर दिला.

**अवकाळी पावसामुळे अनेक**

शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठे नुकसान झाले होत्याचे नव्हते झाले असून काहींची शेती खरडून वाहून गेली आहे.या पार्श्वभूमीवर पुष्पाताईंनी बोरमाळ तांडा,तिडका आणि घोसला या गावांना भेट देत पूरग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधला. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी करत त्यांनी ग्रामस्थांना धीर देत सांगितले की, "संकटाला घाबरू नका, निसर्गाच्या या प्रकोपाला धैर्याने सामोरे जा. मी तुमच्या सोबत आहे. कोणीही खचून जाऊ नये किंवा चुकीचे पाऊल उचलू नये."या दौऱ्यात



घोसला बोरमाळ तांडा आदी पूरग्रस्त मुलांना शैक्षणिक साहित्य — वही, पेन,पेन्सिल,स्केल इत्यादींचे वाटप करण्यात आले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले.या प्रसंगी खरेदी विक्री संघाचे संचालक,मंगेश सोहनी, मयूर मनगटे,भाजपा सरचिटणीस सुनील गावंडे तालुका अध्यक्ष भाजपा संजय पाटील विशाल गिरी,संजीवन सोनवणे मा,पंचायत समिति सदस्य,मा,पंचायत समिती सभापती नंदाताई आगे,जिल्हा अध्यक्ष वंदनाताई पाटील,खरेदी विक्री संघ संचालक रवींद्र पाटील,समाधान बावस्कर,किशोर पाटील,दशरथ झलवार, सदाशिव चव्हाण,राजेश चव्हाण,भगवान पवार आदी आदी मान्यवर उपस्थित होते.

# सार्वजनीक बंधकाम मंत्री मा. ना . श्री शिवेंद्रसिंह राजे भोसले उदगीर जळकोट मतदार संघात पुरग्रस्त भागीची केली पाहानी

## शासनाकडून नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना लवकर मदत मिळणार अशाश्वसन दिले





**दैनिक युवक आधार**
**उदगीर प्रतिनीधी ( बालाजीतेलंगे )**

सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात लातूरजिल्हातील उदगीर व जळकोट तालुक्यात अतिवृष्टी झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून मागील महिनाभरात झालेल्या अतिवृष्टीमुळे उदगीर व जळकोट मतदारसंघात मोठ्या प्रमाणात शेतकरी यांचे नुकसान झाले आहे या वेळी सर्व नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली . सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री यांनी केले त्यावेळी बोलताना म्हणाले की सर्व शेतकरी यांना योग्य न्याय देवु , व शेतकरी यांचे सर्व प्रशन शासन दरबारी मांडू असे आश्वासन पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी दिले व उदगीर ते जळकोट तालुका यासाठी जोडला जाणाऱ्या नॉशनल हावे क्रंमाक 50 या मार्ग वरिल तिरुका येथील मुख्य रस्त्यावरचा पूल वाहून गेल्याने रस्ता बंद झाला होता तसेच शेतीचे मोठे नुकसान झालेले होते. या पार्श्वभूमीवर शेतकरी, पशुपालक यांच्याशी थेट संवाद साधून महायुती सरकार आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, अशी ग्वाही पालकमंत्री साहेबांनी दिली

लवकरच शासनस्तरावरून मदत मिळणार असून शेतकरी बांधवांना दिलासा मिळेल, असा ठाम विश्वास सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले साहेब यांनी दिले त्यावेळी उदगीर जळकोट मतदार संघचे आमदार संजय भाऊ बनसोडे, माजी आमदार गोविदआण्णा केंद्रे , जिल्हा अधिकारी वर्षा ठाकूर व सर्व नेते व कार्यकर्ते उपस्थित होते .

## बालाजी सिम्फनी सुकापूरजवळ अंडरपास बांधण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

सुकापुर बालाजी सिम्फनी रस्त्याजवळ मोठ्या प्रमाणात होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी या ठिकाणी अंडरपास (भुयारी मार्ग) बांधण्याची मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या पनवेल महापालिका महिला जिल्हाध्यक्ष हर्षला योगेश तांबोळी यांनी पत्राद्वारे केली आहे.

आदई सर्कल ते बालाजी सिम्फनी सुकापुर या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या रस्त्याची परिस्थिती वाईट आहे. त्यामुळे रहिवासी आणि प्रवासांना रोज अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे आपत्कालीन रुग्णवाहिका रुग्णालयात पोहोचण्यास विलंब होतो. शालेय विद्यार्थ्यांना देखील वाहतूक कोंडीचा फटका बसतो. प्रवाशांना वेळेवर कामावर आणि घरी जाण्यास विलंब होतो. सायंकाळच्या सुमारास वाहतूक कोंडीत एक तास जातो. रस्ता देखील छोटा असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. रस्ते सुधारणा आणि भुयारी मार्गाचे बांधकाम प्राधान्याने हाती घेतले तर वाहतूक कोंडीच्या समस्या आपोआप सुटतील आणि सुरळीत कनेक्टिव्हिटी, सार्वजनिक सुरक्षितता आणि हजारो दैनंदिन प्रवाशांना सुविधा मिळेल असे हर्षला तांबोळी यांनी सांगितले.

# धर्माबादचा तख्त 'ओपन महिला'साठी खुला

## विविध पक्षांच्या महिला कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाची लाट

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी :गिरमाजी सुर्यकार**

धर्माबाद नगरपरिषदेच्या आगामी निवडणुकीसाठी नगराध्यक्षपदाच्या आरक्षण सोडतीचा निकाल जाहीर झाला असून, या सोडतीत नगराध्यक्षपद "ओपन महिला" प्रवर्गासाठी आरक्षित ठरले आहे. या घोषणेनंतर धर्माबाद शहरात नवी राजकीय चैतन्याची लाट उसळली असून, विविध पक्ष व गटांतर्फे संभाव्य महिला उमेदवारांची चर्चा सुरू झाली आहे.



गेल्या काही दिवसांपासून नगराध्यक्षपद कोणत्या प्रवर्गासाठी सुटेल याबाबत विविध चर्चांना उधाण आले होते. अखेर जाहीर झालेल्या निकालानुसार "ओपन महिला" प्रवर्ग निश्चित झाल्याने धर्माबादच्या राजकारणात नव्या समीकरणांची निर्मिती होणार आहे. या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी आपल्या महिला नेत्यांच्या माध्यमातून निवडणुकीच्या रणनीतीस सुरुवात केली आहे.

धर्माबाद नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी अनेक महिला दावेदार असून आता खरी रंगत पाहायला मिळणार आहे यामध्ये विविध व्यवसायिक आणि शिक्षिकेचा समावेश आहे.

नगराध्यक्षपद महिलांसाठी खुलं झाल्यानंतर शहरातील अनेक सामाजिक संघटनांनीही या निर्णयाचे स्वागत केले आहे. धर्माबादच्या विकासकामांना नव्या उमेदीने चालना मिळावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. यामुळे धर्माबाद नगरपालिकेच्या राजकारणात नव्या अध्यायाची सुरुवात होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

## नाटककार दशरथ राणे यांच्या ११ नाटकांच्या पुस्तकरुपाने नविन आवृत्या प्रकाशित

**दैनिक युवक आधार**
**मुंबई:-(प्रमोद तरळ)**

पविद्यार्थीदशेपासुन सुरवात करुन आजतागायत कथा- कविता - विविध विषयांवर लेख -व्रृतपत्रलेखन - नाट्यलेखन असे समाज प्रबोधन लेखन करणारे मराठी रंगभूमीवरील सुप्रसिद्ध जेष्ठ नाटककार दशरथ राणे यांच्या रंगभूमीवर प्रयोगाचा उच्चांक गाठून गाजलेल्या, नाट्यलेखनाची अनेक पारितोषिकें मिळवणा-या "उसन्या बायकोची वरात लग्नाची" "जमलं बुवा एकदाचं","लग्न शान्तुच्या मेव्हणीचं" या पारितोषिक प्राप्त नाटकाबरोबर, "बायको असुन देखणी", "सौभाग्यलक्ष्मी", "लग्नाआधीची गोष्ट", "अग्निपरिक्षा" "गाव इमानी सरपंच खुनी""शेवटी मीच अपराधी" "अन्यायाचा कर्दनकाळ" " रहस्यभेद" आणि गावगुंडांच्या नावानं विडा उचलला बाईनं हे नविन नाटक प्रकाशित होत आहे.

कथा-कविता तसेच नाट्यलेखनाची



अनेक पारितोषिकें मिळवणारे नाटककार दशरथ राणे यांची नाटक,एकांकिका अशी ७६ पुस्तके प्रकाशित झाली असून त्याच्या काही नाटकांच्या १०/१२ आवृत्या प्रकाशित झाल्या आहेत महाराष्ट्राच्या गावखेड्यापासुन जिल्ह्यास्तरीय नाट्यस्पर्धेत तसेच महाराष्ट्र राज्य हौशी नाट्यस्पर्धेत त्यांच्या नाटकांचे प्रयोग होत असतात. मराठी भाषेबरोबर हिन्दी, गुजराती,,कन्नड भाषेतही गोवा, गुजरात, मध्यप्रदेश, कर्नाटक राज्य,आदि ठिकाणी हौशीरंगभुमीवर त्याच्या नाटकांचे प्रयोग झाले आहेत अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद, मुंबई, मराठी नाटककार संघ,मुंबई, राष्ट्रीय कला गुण गौरव प्रतिष्ठान, पुणे, त्रिमूर्ती आर्ट सेन्टर, बडोदा, महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळ, मुंबई, अशा महाराष्ट्रातील संस्थांबरोबर, महाराष्ट्राबाहेरीलही,४० हून अधिक प्रस्थापित - मान्यवर संस्थानी त्यांच्या साहित्य क्षेत्रातील दिर्घकाळ दिलेल्या योगदानाची दखल घेऊन जीवनगौरव सारख्या उचित पुरस्काराने त्याना सन्मानित केले आहे आता वयाच्या ८० व्या वर्षाकडे वाटचाल करीत असतानाही त्यांच्या लेखनीतून उतरलेल्या शब्दाना वाचकांची नाट्यरसिकांची मिळणारी पंसती म्हणजे त्याच्या गुणगौरव असुन यशस्वी कारकीर्दीची पोचपावती आहे.

# भव्य मिरवणुकीत 'जय काली कंकाली' देवीला भावपूर्ण निरोप!

## चिखलवर्धा येथे ढोल-ताशांच्या गजरात विसर्जन; महिला-बालकांचा प्रचंड उत्साह

**दैनिक युवक आधार - घाटंजी तालुका प्रतिनिधि महेश पेन्दोर**

घाटंजी तालुक्यातील चिखलवर्धा येथे असलेल्या जय काली कंकाली जागृत मंडळातर्फे आज देवीच्या मूर्तीचे विसर्जन आनंदमय आणि उत्साही वातावरणात पार पडले.गाण्याच्या आणि ढोल-ताशांच्या निनादात निघालेल्या भव्य विसर्जन मिरवणुकीने संपूर्ण गाव भक्तिमय झाले होते. देवीच्या जयघोषाने वातावरण भारले होते. या मिरवणुकीत गावातील महिला आणि बालकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत मनसोक्त नृत्य केले. भाविकांचा उत्साह यावेळी पाहण्यासारखा होता.

**मंडळाच्या नेतृत्वात यशस्वी आयोजन:**

अध्यक्ष दिपक कुमरे, उपाध्यक्ष श्रीधर मडावी, सचिव विजय तोडसाम, उपसचिव अरविंद जुगनाके, कौशल सचिव गणेश आत्राम आणि सदस्य घनश्याम जमनाके यांच्यासह सर्व कार्यकर्त्यांनी हा विसर्जन सोहळा यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

जय काली कंकाली जागृत मंडळातर्फे वर्षभर विविध सामाजिक आणि धार्मिक उपक्रम राबवले जातात. यंदाचा विसर्जन सोहळाही शिस्तबद्ध आणि उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला.




# सामाजिक कार्यकर्ते आणि कोरोना योद्धा संतोष पवार यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर उरण रायगड**

आपल्या सर्वांच्या प्रेरणास्थानी असलेल्या सामाजिक कार्यकर्त्यांच्या आणि कोरोना काळात त्यांनी अविरत सेवा दिली असे रायगड जिल्ह्यामधील उरण तालुक्यातील कोरोना योद्धा म्हणून ज्यांना संबोधले जाते. त्यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन सोमवार दि.६ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १० वा. स्थळ : लोकनेते दि.बा. पाटील इंजिनिअरींग कॉलेज, सिडको ऑफीस जवळ, द्रोणागिरी, बोकडविरा येथे करण्यात आले होते. एखाद्या सामाजिक कार्यकर्त्याने वाढदिवस साजरा करण्यासाठी सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून ते सतत योगदान देत असतात.आणि केक, फटाके आणि कार्यक्रमांपेक्षा — रक्तदान हीच खरी मानवसेवा, कारण हे दान केवळ रक्ताचे नसून, एखाद्या जीवाला नवसंजीवनी देण्याचे कार्य आहे. रक्तदाता म्हणजे केवळ व्यक्ती नव्हे तर एखाद्या अनोळखी कुटुंबाचा तारणहार असतो. रक्तदान शिबिर हा उपक्रम समाजाला शिकवतो की, समाजासाठी दिलेलं योगदानच आयुष्याला अर्थपूर्ण बनवतं.




या शिबिराचे आयोजक,उरण वीर वाजेकर कॉलेज कॅम्पसचा लायन्स क्लब लायन संदिप म्हात्रे

प्रोजेक्ट कोऑडीनेटर Ad राजेंद्र मढवी आणि प्रशांत पाटील हे आहेत त्याचप्रमाणे तेरणा रक्तपेढी नेरूळ यांच्या विद्यमाने हे शिबीर आयोजित करण्यात आले होते.

रक्तदाता आणि प्रेरणादायी वाढदिवस साजरा करणाऱ्या मान्यवर कार्यकर्त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा सर्व स्तरातून दिल्या जात आहेत.उरण तालुक्यातील प्रत्येक नागरिकाच्या तोंडून सदर सामाजिक कार्यकर्त्यांच्या रक्तदान शिबिराने प्रत्येकाला नवीन प्रेरणा मिळणार आहे. रक्तदानापेक्षा श्रेष्ठदान कोणतेच नाही. असे मत देणाऱ्या प्रत्येक रक्तदात्याचे होते म्हणून सुट्टीचा वार नसतानाही या सामाजिक कार्यकर्त्यांच्या वाढदिवसानिमित्त ठेवलेल्या रक्तदान शिबिराला चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळाला.

रक्तदान शिबिराला येणाऱ्या प्रत्येक रक्तदात्याला प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येत होते आणि आदरणीय सामाजिक कार्यकर्ते संतोषजी पवार यांनी रक्तदात्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

**daily YUVAK ADHAR** Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# आगरी समाजाचा साहित्य संगम सोहळा उत्साहात ; मांडला येथे अखिल भारतीय आगरी साहित्य संस्थेचा भव्य सोहळा

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

आगरी समाजाची भाषा, परंपरा आणि संस्कृती यांचा संगम घडवणारा अखिल भारतीय आगरी साहित्य संस्थेचा साहित्य संगम सोहळा मांडला (ता. मुरुड) येथील ग्रीन किंग रिसॉर्ट येथे शेकडो साहित्यिक व मान्यवरांच्या उपस्थितीत दिमाखात पार पडला.या सोहळ्याचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ साहित्यिक अमृत पाटील यांनी भूषविले होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये अलिबाग नगरपालिकेच्या माजी उपनगराध्यक्षा सौ. मानसी म्हात्रे, संस्था अध्यक्ष कैलास पिंगळे, साहित्यिक सुरेश भोपी, साहित्यिक चंद्रकांत पाटील, आवाज महामुंबईचा चे संपादक मिलिंद खारपाटील, ॲड. राकेश पाटील, ज्येष्ठ पत्रकार धम्मशील सावंत आदी मान्यवरांचा समावेश होता."आगरी भाषा लोप पावणार नाही"संस्थेचे अध्यक्ष कैलास पिंगळे सर यांनी प्रास्ताविक करताना सांगितले "एक आगरी,



लाखांना भारी. आगरी भाषा जोमाने पुढे जात राहील. आज अनेक नवनवीन पुस्तके आगरी भाषेत प्रकाशित होत आहेत. नवोदित लेखकांचे स्वागत करून त्यांना प्रोत्साहन देणे, हेच आमचे ध्येय आहे."

त्यावर प्रमुख पाहुण्या सौ. मानसी म्हात्रे म्हणाल्या "तुम्ही उच्चशिक्षित व्हा आणि तुमच्या साहित्यामधून समाजापर्यंत समृद्ध विचार पोहोचवा. आगरी साहित्य दालन दिवसेंदिवस अधिक समृद्ध होत राहावे, हेच आमचे अपेक्षित ध्येय आहे."सांस्कृतिक गोडवा आणि सन्मान या कार्यक्रमाची सुरुवात वावे ग्रामस्थांच्या गायनाने आणि भवर नृत्याने झाली. आगरी समाजाची सांस्कृतिक परंपरा यातून उलगडून दिसली.त्यानंतर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना शाल, पुष्पगुच्छ, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. त्यामध्ये ज्येष्ठ साहित्यिक सुरेश भोपी, कृष्णा जोशी, मारुती बागडे, अरुण द. म्हात्रे, प्रा. संदेश पाटील, जयंत पाटील, विकास पाटील, चंद्रकांत कांडपिले यांचा समावेश होता.

तर अन्यायाला वाचा फोडणाऱ्या निर्भीड रणरागिणी म्हणून परिचित सौ. मानसी म्हात्रे यांना सरखेल पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली.

या सोहळ्यात नंदेश गावंड लिखित आगरासत्र या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृप्ती गावंड यांनी ओघवत्या शैलीत केले. शेवटी सुश्राव्य भजनाने या कार्यक्रमाची सांगता झाली.आगरी समाज श्रम, संस्कृती आणि परंपरेचे दर्शन आगरी समाज हा परंपरेने समुद्राशी, श्रमाशी आणि मातीतल्या गंधाशी जोडलेला आहे. समुद्रकिनारी शेती, मासेमारी, मीठउद्योग, नारळ-काजू शेती या सर्व जीवनशैलीने आगरी संस्कृती घडवली. या समाजाची कष्टाळूपणा, प्रामाणिकपणा आणि सांस्कृतिक अभिमान ही वैशिष्ट्ये आजही तितकीच तेजस्वी आहेत. त्यांची भवर नृत्य, लोकगीते आणि आगरी बोलीची गोडी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशात अमूल्य ठेवा म्हणून ओळखली जाते. या परंपरेला साहित्यिकांचा बळकट हातभार लाभत असल्याने आगरी समाजाचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचत आहे.या भव्य सोहळ्यातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले की "आगरी अस्मिता अमर आहे. साहित्य, संस्कृती आणि समाजकार्य यांचा संगमच आगरी समाजाला बलशाली बनवतो."

## रमाई नगरमधील नागरिकांचा संताप — “एक बाजूची नाली आणि तुटलेल्या स्लॅबमुळे पाणी थेट रस्त्यावर!”

**दैनिक युवक आधार**
**लातूर प्रतिनिधी मोहम्मद पिंजारी**

मुरुड (ता. लातूर) – रमाई नगर परिसरातील नागरिक गेल्या काही वर्षांपासून एकाच समस्येला कंटाळले आहेत. या भागातील मुख्य रस्ता जरी व्यवस्थित आणि चांगल्या अवस्थेत असला, तरी रस्त्याच्या उजव्या बाजूला असलेली नालीच नागरिकांसाठी मोठं संकट ठरली आहे. नाली केवळ एका बाजूने करण्यात आल्याने पावसाचं पाणी मोकळेपणाने वाहू शकत नाही, परिणामी ते थेट रस्त्यावर साचतं. काही ठिकाणी ही नाली पूर्णपणे बुजून गेली असल्यामुळे पाण्याचा निचरा थांबतो आणि पाणी घरांसमोर, दुकानांसमोर सांडतं. पावसाळ्यात तर परिस्थिती अधिक बिकट बनते. वारंवार ग्रामपंचायतीकडे तक्रारी करूनही समस्या तशीच आहे. नागरिकांचा प्रश्न अगदी सरळ आहे – “रस्ता केला, पण पाण्याचा निचरा नाही केला, तर हा विकास कसला?”

दरम्यान, डॉ. छलाणी दवाखान्याच्या समोर असलेल्या पुलावरील स्लॅबला तडे गेल्याने तो तीन वर्षांपूर्वी तुटला, आणि आजवर त्याची दुरुस्तीही झालेली नाही. या स्लॅबवरून दररोज नागरिक, रुग्ण आणि वाहनांची सतत ये-जा होते, पण तुटलेल्या अवस्थेमुळे अनेक लहान-मोठे अपघात झाले आहेत. ग्रामपंचायतीने याकडे पूर्ण दुर्लक्ष केल्याचा नागरिकांचा आरोप आहे. “कागदावर काम दाखवून प्रत्यक्षात काहीच होत नाही,” असा थेट आरोप रहिवाशांनी केला आहे.



दवाखान्याजवळील हा भाग अतिशय वर्दळीचा असून, अशा धोकादायक परिस्थितीत प्रशासन अजूनही गप्प बसले आहे, हे धक्कादायकच आहे. लोक विचारतात – “एखादा मोठा अपघात झाल्यावरच का प्रशासन हलणार?” या निष्क्रियतेमुळे लोकांचा ग्रामपंचायतीवरील विश्वासच उडाल्याचे स्पष्ट दिसते.

नागरिकांनी आपल्या लिखित अर्जात मागणी केली आहे की, रमाई नगर भागातील पायऱ्यांच्या रस्त्यापासून ते डॉ. छलाणी दवाखान्यापर्यंतच्या रस्त्याच्या उजव्या बाजूस नवी, रुंद आणि दोन्ही बाजूंनी नाली करण्यात यावी तसेच तुटलेल्या स्लॅबची तातडीने दुरुस्ती करावी. गेली तीन वर्षं समस्या कायम असून, ग्रामपंचायतीने आता तरी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावं, अशी मागणी सर्वपक्षीय नागरिकांनी केली आहे. अन्यथा नागरिकांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, या दुर्लक्षाविरोधात आंदोलन उभारले जाईल. “आम्ही शांत आहोत म्हणजे आम्हाला फरक पडत नाही असं नाही; पण आता संयम संपत चालला आहे,” असं नागरिकांनी ठामपणे सांगितलं आहे. आता प्रशासनाने जनतेचा आवाज ऐकून तातडीने नाली व स्लॅबचं काम सुरू करावं, अन्यथा रमाई नगरचा रोष ग्रामपंचायत कार्यालयासमोर पेटून उठेल — हे नक्कीच!

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा शतक पूर्ती आणि विजया दशमी उत्सव उत्साहात पार पडला



**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी -अनिकेत मोहित**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजया दशमी उत्सव आज अत्यंत उत्साहात व पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. यावर्षीचा हा उत्सव विशेष ठरला कारण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला 100 वर्षे पूर्ण झाली आहेत. या शताब्दी वर्षानिमित्त संघ स्वयंसेवकांमध्ये विशेष उत्साह आणि अभिमानाचे वातावरण पाहायला मिळाले.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून श्री. निलेश नाक्ती उपस्थित होते, तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. पराग पिंपळापुरे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या प्रभावी भाषणातून संघाचे आदर्श, राष्ट्रनिष्ठा, आणि समाजकार्याचे महत्त्व यावर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, “संघाचे कार्य हे केवळ शाखेपुरते मर्यादित नसून समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी असते. देशहित, संस्कृती संरक्षण आणि नागरिकांमध्ये संघटितपणाची भावना जागृत करणे हेच संघाचे प्रमुख ध्येय आहे.”

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. जिल्हा कार्यवाह श्री. प्रशांत ढेपे यांनी भूषविले. तसेच तालुका कार्यवाह श्री. श्रेयस पेंडसे यांनी संघाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, संघाच्या 100 वर्षांच्या कार्यकाळात अनेक स्वयंसेवक समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात आपले योगदान देत आहेत — शिक्षण, सेवा, पर्यावरण, संस्कृती आणि राष्ट्रभक्ती या सर्व क्षेत्रात संघाचे कार्य व्यापक पसरले आहे.

या उत्सवाला स्वयंसेवक, नागरिक तसेच मातृशक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होती. पारंपरिक गणवेशात स्वयंसेवकांनी शाखेचे प्रात्यक्षिक सादर केले. शस्त्रपूजन आणि ध्वजवंदनानंतर विजया दशमीच्या शुभेच्छा देत कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

शेवटी संघगीताने वातावरण भारावून गेले आणि उपस्थित सर्वांनी “भारत माता की जय” च्या घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला.

## प्रियदर्शनी प्राथमिक शाळा, पाटोदा येथे लोकनेत्या स्वर्गीय केशरकाकू क्षीरसागर यांची पुण्यतिथी साजरी

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा(प्रतिनिधी)-**

पाटोदा शहरात असणाऱ्या प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये संस्था सचिव मा.डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर व डॉ.सारीकाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड-अहिल्यानगर रेल्वे च्या शिल्पकार लोकनेत्या स्वर्गीय केशरकाकू क्षीरसागर यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या वेळी स्वर्गीय काकूंच्या प्रतिमेला अभिवादन करून विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या या मध्ये हस्ताक्षर स्पर्धा, सामान्य ज्ञान, स्पर्धा चित्रकला, रंगभरण स्पर्धा अशाच पद्धतीच्या स्पर्धा घेण्यात आल्या या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती केदार ताई व श्रीमती गायके मॅडम या उपस्थित होत्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री मोरे सर हे होते. तर आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे स्वागत श्रीमती वीर मॅडम यांनी केले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. माताडे सर यांनी केले. तथा कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्रीमती शेलार मॅडम यांनी केले. या वेळी काकूंच्या जीवन चरित्राची माहिती देत असताना आशिया खंडातील पहिला साखर कारखाना सुरू करणारी महिला म्हणून काकू इतिहासात अजरामर झाल्या तसेच अहिल्यानगर ते बीड जी




रेल्वे सुरू झाली त्या रेल्वेच्या त्या शिल्पकार झाल्या काकूंनी गोरगरिबांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. त्यांनी सुरू केलेल्या शाळा कॉलेजमधून आज अनेक हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत. शिक्षणाची गंगा वाडी तांड्यापर्यंत पोहोचवण्याचे काम काकूंनी केले. अशा या काकूंना शाळेत आदरांजली वाहण्यात आली व शेवटी पसायदानाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## अभिजात भाषेच्या दर्जामुळेच मराठी भाषेची जागतिक स्तरावर ओळख निर्माण झाली !:- प्रा.डॉ.गोविंद बामदळे

### जयभवानी महाविद्यालयात मराठी अभिजात भाषा दिन साजरा



**दैनिक युवक आधार**
**पाटोदा(प्रतिनिधी)-**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळेच मराठी भाषेची जागतिक स्तरावर ओळख निर्माण झाली आहे! असे प्रतिपादन प्रा.डॉ.गोविंद बामदळे यांनी केले. ते मराठी विभाग आयोजित "मराठी अभिजात भाषा दिन "कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की मराठी भाषेची परंपरा प्राचिन आहे.चक्रधरस्वामी, मुकुंदराज, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर यांनी मराठी भाषा समृध्द केली आहे. आपण सर्वांनी सर्व क्षेत्रात तिचा वापर करावा असे त्यांनी शेवटी आवाहन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र.प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे हे होते तर व्यासपीठावर क्रिडाविभाग प्रमुख प्रा.डॉ.प्रविण शिलेदार, नाटककार प्रा. बापू घोक्षे, प्रा.डॉ.रामकृष्ण प्रधान, प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. सर्व प्रथम अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या शुभहस्ते श्री.चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.प्रस्ताविक प्रा.डॉ.रामकृष्ण प्रधान यांनी केले. प्रा.डॉ.प्रविण शिलेदार यांनी दोन शब्द व्यक्त केले. प्रा.बापू घोक्षे व प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी मराठी भाषेची परंपरा सांगुन तिचे महत्व सांगितले.

अध्यक्षीय समारोप करताना प्र. प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे यांनी मराठी भाषेला प्राचिन परंपरा आहे. मराठी भाषेने सामाजिक, सांस्कृतिक, ऐत्याहासिक वारसा जतन केला आहे. त्यामुळे केंद्र सरकारने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यामुळेच ३ ऑक्टोबर हा अभिजात भाषा दिवस साजरा केला जातो असे सांगितले. कार्यक्रमाचे संचलन कु.अस्मिता मुंढे या विद्यार्थीनीने केले. तर आभार कु.श्रावणी कांडेकर हिने व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम सर यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी विभागातील प्राध्यापक, विद्यार्थी व श्रीमती साळुबाई नाईकनवरे आदिनी अथक परिश्रम घेतले. या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# सांगवी पाटण येथे सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताह सोहळा

## संत कृपा हाच खरा तारणहार संतांनी केलेले उपकार शब्दात सांगता येत नाही - रामराव महाराज ढोक

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी / मारुती सत्रे**

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताह निमित्त शनिवार दि. ०४/१०/२०२५ रोजी संध्याकाळी हभप श्री रामराव महाराज ढोक (नागपूरकर) यांची कीर्तनाची सेवा संपन्न झाली.



या कीर्तनात त्यांनी संत सेना महाराज यांचा ओंजळीस आलेला 'उदार तुम्ही संत! मायबाप कृपावंत!!' या ओळी सुरुवातीला असलेला एक अभंग सादर केला.या अभंगाद्वारे त्यांनी श्रोत्यांच्या मनात संतांच्या कृपेचे,उपकारांचे आणि मार्गदर्शनाचे सुवर्णाक्षर कोरून दिले.

कीर्तनकार श्री.रामराव महाराज ढोक यांनी सादर केलेल्या या अभंगातून संतांच्या महत्त्वाचे खोलवर विश्लेषण केले.अभंगातील 'उदार तुम्ही संत! मायबाप कृपावंत!!'या ओळीतून संत हे केवळ उपदेशक नसून,मायेचे आणि कृपेचे सागर,मायबाप स्वरूप आहेत,ही भावना व्यक्त झाली आहे.'केवढा केला उपकार ! काय वाणू मी पामर!!'या ओळीतून साधक स्वतःला पामर (अत्यंत क्षुल्लक) म्हणवून घेऊन,संतांनी केलेला उपकार शब्दांत सांगता येणार नाही इतका मोठा आहे,याची खंत व्यक्त केली आहे.'जड जीवा उद्धार केला!मार्ग दाखविला सुपंथ !!'यामध्ये संतांनी जड आणि भौतिकतेत गुरफटलेल्या जीवाला सहजासहजी उद्धरून,त्याला परमार्थाचा सरळ मार्ग (सुपंथ) दाखविला,याचे वर्णन आहे.शेवटच्या दोन ओळी 'सेना म्हणे उतराई !होता काही दिसेना !!'यात संत सेना महाराज सांगतात की,संतांनी केलेल्या या सर्व उपकारांची परतफेड (उतराई) करणे शक्य नाही,कारण संतांच्या कृपेपूर्वी साधकाला काहीच दिसत नव्हते,म्हणजेच त्याची स्थिती अंधारातील होती.

अभंगामागील संदेश स्पष्ट करताना कीर्तनकार म्हणाले,की संत-कृपा हाच खरा तारणहार आहे आणि संतच भक्ताला भगवद्प्राप्तीचा सोपा मार्ग दाखवितात.

ही कीर्तन सेवा उत्साहात,भक्तिभावातून पार पडली.यावेळी सांगवी पाटण व पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने भक्त,संत, महंत उपस्थित होते.सप्ताह समितीने या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

# वंचित बहुजन आघाडी अर्धापूर तालुका कमिटीची निवडणूक तयारी बैठक उत्साहात संपन्न!

## वंचितांचा आवाज – लोकशाहीचा नवा प्रवास!



**दैनिक युवक आधार**
**अर्धापूर प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडी तालुका अर्धापूर यांची अत्यंत महत्वाची बैठक आज दि. 05 ऑक्टोबर 2025 रोजी अर्धापूर कार्यालय येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

बैठकीस तालुक्यातील सर्व आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला बांधव आणि युवकांची उत्स्फूर्त उपस्थिती होती. या बैठकीत निवडणुकीच्या नियोजनासोबत गाव पातळीवरील संघटन बांधणी, शाखा अनावरण, बूथस्तरावर पक्षाची मजबुती, सदस्य नोंदणी मोहीम आणि वरिष्ठ नेत्यांच्या दौऱ्याचे नियोजन यावर सविस्तर चर्चा झाली.

तालुकाध्यक्ष विनय मोरे यांनी बैठकीत स्पष्ट केले की, "वंचित बहुजन आघाडीचा लढा हा सत्तेसाठी नाही, तर सर्व वंचित, शोषित, उपेक्षित आणि सर्व जाती-धर्मातील सामान्य जनतेच्या हक्कांसाठी आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या गावागावात जाऊन वंचित बहुजन आघाडीचे विचार शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवावे, जनतेशी थेट संवाद साधावा आणि मतदारांमध्ये जागृती निर्माण करावी."

ते पुढे म्हणाले, "आगामी स्थानिक स्वराज्य निवडणूक ही परिवर्तनाची संधी आहे. अन्यायकारक सत्ताधाऱ्यांना पराभूत करून जनतेच्या प्रश्नांना आवाज देणारी सत्ता निर्माण करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्ता रणांगणात उतरावा."बैठकीत निर्णय घेण्यात आला की पुढील आठवड्यात जिल्हा पदाधिकाऱ्यांचे दौरे होणार असून, मोठ्या प्रमाणावर शाखा अनावरण आणि सदस्य नोंदणी मोहिम राबवली जाईल."प्रत्येक गावात, प्रत्येक समाजात – वंचित विचारांची मशाल पेटवा!"

# वंचित बहुजन आघाडी – भोकर तालुका कमिटीची भव्य बैठक संपन्न!

## स्थानिक स्वराज्य निवडणुकीसाठी रणधुमाळीची सुरुवात!

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी योगेश चौदंते**

**मुदखेड:-**स्थानिक स्वराज्य निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडी, तालुका भोकर यांची अत्यंत महत्त्वाची बैठक आज शासकीय विश्रामगृह, भोकर येथे उत्साहात पार पडली. या बैठकीस तालुक्यातील सर्व आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



बैठक जिल्हाध्यक्ष राजेश्वर पालमकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच तालुका अध्यक्ष दिलीप केरबा राव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

बैठकीत आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांसाठी सशक्त नियोजन, गावागावात शाखा आणि बूथ बांधणी, तसेच सदस्य नोंदणी मोहिम राबविण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.

बैठकीत बोलताना तालुका अध्यक्ष दिलीप राव म्हणाले,"वंचित बहुजन आघाडी आता सर्व निवडणुका स्वबळावर लढविण्यास सज्ज आहे. उमेदवारी फक्त निष्ठावंत आणि जनतेत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनाच दिली जाईल. प्रत्येक गाव, प्रत्येक वार्डात जाऊन पक्षाचे विचार सर्व जाती-धर्माच्या लोकांपर्यंत पोहोचवणे ही प्रत्येक कार्यकर्त्याची जबाबदारी आहे."

त्यांनी पुढे सांगितले की, आगामी आठवड्यात जिल्हा कमिटीचे दौरे आयोजित करण्यात येतील, ज्यामध्ये शाखा अनावरण, सदस्य नोंदणी, प्रचार नियोजन आणि मतदार संपर्क यावर विशेष भर असेल.

बैठकीत वक्त्यांनी ओबीसी, एससी, एसटी आणि मुस्लिम बांधवांच्या प्रश्नांवर ठोस भूमिका घेत, "वंचितांचा हक्क, संविधानाचा रस्ता" या घोषवाक्याने जनजागृती करण्याचे आवाहन केले.बैठकीच्या शेवटी सर्व कार्यकर्त्यांनी एकजूट, संघटनशक्ती आणि बदलाची लढाई यासाठी सज्ज राहण्याची शपथ घेतली.

"प्रत्येक गावात वंचित बहुजन आघाडीचा झेंडा फडकला पाहिजे, हीच खरी निवडणुकीची तयारी!"

# खरडून गेलेल्या जमिनीसाठी विशेष पॅकेज जाहीर करा; खा रवींद्र चव्हाण मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांची प्रत्यक्ष मुंबई भेट घेऊन मागणी



**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

नांदेड जिल्ह्यात अतिवृष्टी व ढगफुटीमुळे खरडून गेलेल्या जमिन्नीसाठी विशेष पेकेज देऊन शेतकऱ्यांना आर्थिक आधार द्यावा, अशी मागणी खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे शुक्रवारी एका निवेदनाद्वारे केली अनूकंपा धारकांना नियूक्ती आदेश वाटप कार्यक्रमासाठी मुंबईत यशवंतराव चव्हाण सेंटर येथे उपस्थित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची खा.रवींद्र चव्हाण यांनी भेट घेतली.

याप्रसंगी नांदेड जिल्ह्यातील पुरपरिस्थिती , बाभळी बंधारा बॅक वॉटर व अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबत २० मिनिटे चर्चा झाली पुरामुळे जिल्ह्यातील शेकडो हेक्टर जमीन खरडून गेली असून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे त्यामुळे शासनाने खरडून गेलेल्या जमिन्नीसाठी कर्नाटक सरकारच्या धर्तीवर नांदेडसाठी विशेष पेकेज जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा या मागणीचे निवेदन त्यांनी सादर केले.

खा. रवींद्र चव्हाण यांनी निवेदनात नमूद केलेल्या मुद्द्यांवर चर्चा करून निर्णय घेऊ,असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी दिले. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री या दोघांनाही खासदार रवींद्र चव्हाण यांनी मागण्यांचे स्वतंत्र निवेदन सादर केले.या वेळी,पणन मंत्री ना.जयकुमार रावल, शिक्षण मंत्री दादाजी भुसे,आशिष शेलार,ना. छगन भुजबळ यांचीही उपस्थिती होती

# विंचूरचे प्रसिद्ध व्यापारी पवन जाजू यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्यामुळे विंचूर कडकडीत बंद





**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**विंचूर:-** (ता. निफाड) येथील प्रसिद्ध व्यापारी पवन नंदकुमार जाजू यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्याच्या निषेधार्थ सोमवारी विंचूर शहरात स्वयंस्फूर्तपणे कडकडीत बंद पाळण्यात आला. हल्ल्यामुळे शहरात संतापाचे वातावरण असून व्यापारी, नागरिक आणि विविध संघटनांनी या घटनेचा तीव्र निषेध नोंदविला आहे.

रविवारी रात्री विंचूरच्या मारवाडी पेठ परिसरात व्यापारी पवन जाजू यांच्यावर त्यांच्या परिचित असलेल्या मनोज गोराडे या तरुणाने धारदार शस्त्राने हल्ला केला होता. या हल्यात जाजू गंभीर जखमी झाले असून त्यांना तात्काळ लासलगाव व नंतर नाशिक येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती चांगली असल्याचे वृत्त आहे.या घटनेनंतर सोमवारी सकाळपासूनच विंचूर शहरातील सर्व व्यापारी प्रतिष्ठाने, किराणा दुकाने, हॉटेल्स, वाहतूक व्यवस्था आणि बाजारपेठा बंद राहिल्या. नागरिकांनी शांततेत निषेध व्यक्त करत आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी केली. स्थानिक पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे.

विंचूर व्यापारी संघाचे पदाधिकारी यांनी सांगितले की, "हा हल्ला केवळ एका व्यापाऱ्यावर नव्हे तर संपूर्ण व्यापार जगतावर झालेला आहे. आरोपीस तातडीने अटक करून कडक शिक्षा झाली पाहिजे."दरम्यान, पोलिसांनी परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवत नागरिकांना अफवा न पसरविण्याचे आवाहन केले आहे. संध्याकाळपर्यंत शहरात शांतता प्रस्थापित झाली असली तरी नागरिकांमध्ये अजूनही संताप व भीतीचे वातावरण आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मोहन पाटील, हवालदार डगळे, अविनाश सांगळे, धुमाळ व हवालदार

# नजर चुकली कृषी अधिकाऱ्यांची... भरपाई मात्र शेतकऱ्यांची !

## सेलू शिवारातील शेतकरी पिक विम्यापासून वंचित; आक्रोश वाढला, उपोषणाचा इशारा

**दैनिक युवक आधार सेलू तालुका प्रतिनिधी ( ग्रामीण):- विठ्ठल राऊत**

मौजे सेलू तालुका सेलू जिल्हा परभणी येथील शेतकऱ्यांना खरीप 2024 चा पिक विमा मंजूर असतानाही ICICI LOMBARD कंपनीकडून न.प. सेलूच्या हद्दीचे कारण देत विमा नाकारण्यात आला आहे. या अन्यायाविरोधात शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे.

शेतकऱ्यांच्या वतीने यापूर्वी वारंवार निवेदने जिल्हाधिकारी, कृषी अधीक्षक, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी यांना सादर करण्यात आली होती. त्यानंतर जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ नियमानुसार कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते. तसेच, जिल्हा कृषी अधीक्षकांनी विभागीय आयुक्त पुणे यांना अहवाल पाठवून सेलू गाव नजरचुकीने बीगर महसुली दाखविण्यात आल्याचे स्पष्ट केले होते. त्यावर योग्य तपासणी करून पात्र शेतकऱ्यांना पिक विमा वितरीत करण्याचे निर्देश दिले गेले होते.



तरीदेखील आजपर्यंत शेतकऱ्यांना विमा न मिळाल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे. "पिक विमा न मिळाल्यास आमचे पर्याय संपले असून आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करू" असा इशारा नुकसान ग्रस्त शेतकरी शिवकुमार नवाडे ,विशाल लोया ,चेतन फोपसे, सुभाष फोपसे, अरुण फोपसे, बापूसाहेब शेरे, आश्विन लोया, महादेव शेरे, बबन शेरे ,गोविंद शेरे ,गजानन जमखडे, ऋषिराज वाकणकर, रितेश लोया, देवेंद्र नावाडी, नितीन कुलकर्णी, शिवराज सोळंके इत्यादी सेलू शिवारातील शेतकऱ्यांनी सेलू येथील तहसीलदार शिवाजी मगर यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

व सदरील घटनेचे पत्र राज्याचे मुख्यमंत्री यांनाही देण्यात आले आहे.

शेतकऱ्यांचा हक्क गेला... नजर चुकीच्या नावाखाली अधिकाऱ्यांचे हात वर!"

शेतकऱ्यांच्या नशिबाशी नजरचूक!

सेलू हे गाव 'बीगर महसुली' असल्याचा अहवाल कृषी अधिकाऱ्यांनी काय तर चुकून सादर केला. आता या 'नजर चुकी'चा फटका शेतकऱ्यांना बसतोय आणि पिक विम्यापासून ते वंचित झालेत. शेतकऱ्यांच्या घामाचे सोने करणारे हे कागदी खेळ बघून गावकरी विचारतात .

"शेतकरी विम्याला पात्र की नाही, हे बघताना अधिकारी झोपले होते काय?"

"नजर चुकीचा अहवाल दिल्यावर अधिकारी पगार तरी 'नजर अचूक' कसा घेतात?"

शेतकऱ्यांच्या खिशाला कापून अधिकारी मात्र चुकांना 'टंकलेखनाची भूल' ठरवतात. प्रश्न इतकाच –

शेतकऱ्यांच्या हक्कावर डाका घालणाऱ्या या नजर चुकीची भरपाई कोण करणार?

गावकऱ्यांचे एकच म्हणणे –

"आमच्या पिकांचे नुकसान झाले, पण अधिकारी मात्र नुकसानभरपाईच्या नजरबंदीबाहेरच!

# श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली गावात नागाव मोहल्ल्यात गोवंश कत्तलीचा प्रकार; तिघांवर गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली गावाच्या हद्दीतील नागाव मोहल्ला परिसरात दि. ३ ऑक्टोबर २०२५ रोजी शासनाने प्रतिबंध केलेल्या गोवंश जातीच्या काळ्या रंगाच्या जनावराची कत्तल केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

प्राप्त माहितीनुसार, आरोपी बिलाल उस्मान शेख (वय ३१, रा. नागाव मोहल्ला, बोर्ली पचतन), नाविद मोहम्मद हसवारे (वय २९, रा. नागाव मोहल्ला, बोर्ली पचतन) आणि सुलतान हसनखान पठाण (वय ४२, रा. पांगळोली, ता. म्हसळा) यांनी स्वतःच्या फायद्यासाठी गोवंश जातीच्या काळ्या रंगाच्या जनावराची कत्तल करून त्याचे मांस ताब्यात ठेवले असल्याची माहिती मिळाली.

या प्रकारामुळे शासनाने घालून दिलेल्या प्राणी संरक्षण नियमांचे उल्लंघन झाल्याने, दिघी सागरी पोलिसांनी वरील तिघांविरुद्ध गुरनं ६८/२०२५ भारतीय दंड संहिता कलम ३२५(३)(५) सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५(क), ९(१)(अ) नुसार कारवाई करण्यात आली आहे.

दरम्यान, आरोपी नाविद मोहम्मद हसवारे याच्याविरुद्ध यापूर्वीही गु.र.नं. ४१/२०२३ अंतर्गत भा.द.वि. कलम ३४ सह महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियमानुसार गुन्हा नोंद असल्याचे समजते.

सदरील घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक अर्शद शेख करीत असून, घटनास्थळाची पाहणी सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत शिंदे यांनी केली.

या प्रकरणाची फिर्याद पोलीस नाईक अनिल हरी कुंथे (बकल क्र. २३०९, दिघी सागरी पोलीस ठाणे) यांनी दिली आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# जीव देऊ पण आदिवासी समाजात इतर समाजाची घुसखोरी होऊ देणार नाही,आर्णीत आदिवासी जनआक्रोश मोर्चा व रस्ता रोको

## आदिवासी समाजातील पुरुषांसह महिलांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद,१० हजार पेक्षा जास्त समाजबांधवांची सहभाग

**दैनिक युवक आधार**
**उमेश साखरकर**
**दिग्रस तालुका प्रतिनिधी**

बंजारा समाजासह धनगर व इतर समाजाकडून होत असलेल्या आदिवासी आरक्षणाच्या मागणी विरोधात आता आदिवासी समाज आक्रमक झाला यावेळी आमदार राजू तोडसाम. जितेंद्र मोघे. डॉ विष्णु उकंडे राहुल सोयाम असून,अशातच आर्णी तालुका सकल आदिवासी समाजाच्या वतीने ६ ऑक्टोबर रोजी आर्णी शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती येथून आरक्षण बचाव मोर्चा काढण्यात आला.

महाराष्ट्र राज्य सरकारने मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी काढण्यात आलेल्या हैद्राबाद गॅझेटनुसार बंजारा समाज आदिवासी आरक्षणात समावेश करण्यासाठी मोर्चे आंदोलन करत आहे.त्यामुळे आता आदिवासी समाज सुद्धा बंजारा समाजाच्या मागणी विरोधात आक्रमक झाला असून,महाराष्ट्र भर मोर्चे आंदोलन करत आहे. याचेच पडसाद महाराष्ट्रातील जिल्ह्यात तालुक्यात उमटत असून,अशातच आर्णी तालुका सकल आदिवासी समाजाच्या वतीने ६ ऑक्टोबर रोजी आदिवासी आरक्षण बचाव जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.



६ ऑक्टोबर रोजी दुपारी एक वाजता आदिवासी समाजबांधवानी आदिवासी समाजात बंजारा,धनगर व इतर कुठल्याही जातीचा समावेश करू नये अशा प्रमुख मागण्यासह जन आक्रोश मोर्चाला कृषी उत्पन्न बाजार समितीपासून सुरुवात झाली.असता समाज बांधवानी एकच आक्रोश केला. एक तिर एक कमान सारे आदिवासी एक समान,आदिवासी कोण है देश का मालक है अशा अनेक घोषणांनी आर्णी शहर दणाणून गेले होते.हा मोर्चा माहूर चौक, यवतमाळ मार्गाने मार्गक्रमण करीत,शिवनेरी चौक,नवीन कृषी उत्पन्न बाजार समिती ते वन विभागाच्या कार्यलायाच्या बाजूला असलेल्या बच्चेवार ले - आउट येथे सभा घेण्यात आली.

यावेळी मोर्चाला उपस्थित मान्यवरांनी आदिवासी समाज बांधवाना संबोधित केले.सभा आटोपल्यानंतर नागपूर - तुळजापूर राष्ट्रीय महामार्गांकडे मार्गक्रमण करीत दत्तरामपूर नजीक असलेल्या येरमे पेट्रोल पंप येथे रस्ता रोको केला.आपल्या मागण्यांचा पाढा वाचत आदिवासी समाजाने आक्रोश केला.शांततेच्या मार्गाने काढण्यात आलेल्या या मोर्चाला गालबोट लागून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी आर्णीचे ठाणेदार निलेश सुरडकर यांनी पोलिसांचा तगडा बंदोबस्त लावला होता.दरम्यान आर्णीचे तहसीलदार वैशाख वाहुरवाघ यांनी घटनास्थळी भेट देऊन आदिवासी बांधवांच्या मागण्या शासन दरबारीं पाठवणार असल्याचे आश्वासित केले असता,आदिवासी समाज बांधवानी अडवलेला महामार्ग मोकळा केला.या मोर्चात आर्णी तालुक्यातील हजारो आदिवासी बांधव सहभागी झाले यावेळी पुरुषा पेक्षा महिला ची संख्या मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते संचलन राहूल सोयाम यांनी केले तर आभार दत्ता पंधरे यांनी मानले

# युवासेना राळेगाव तालुका प्रमुख पदी मयुर जुमळे यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**

**राळेगाव:**-शिवसेना मुख्य पक्षनेते महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा.श्री. एकनाथजी शिंदे व यवतमाळ जिल्हा पालकमंत्री मा.ना.श्री.संजय राठोड यांच्या कार्याला प्रेरित होऊन व शिवसेना संपर्कप्रमुख हरीहर लिंगनवार, विधानसभा समन्वयक जानरावजी गिरी शिवसेना तालुका प्रमुख मनोज भोयर यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनाखाली शिवसेना (शिंदे गट) पक्षात प्रवेश करण्यात आला यवतमाळ जिल्हा पालकमंत्री मा.ना.संजय राठोड यांची काम करण्याची शैली आणि ८०% समाजकारण आणि २०%राजकारण या कार्यपद्धतीने भारावून हा प्रवेश झाला असल्याचे मयुर जुमळे यांच्या कडून सांगण्यात आले,मयुर जुमळे यांचा प्रवेश होताच तालुक्यात असलेला दांडगा जनसंपर्क युवकांमध्ये असलेली ओळख या सर्व गोष्टी मुळे त्यांना युवासेना तालुका प्रमुख पदी निवड करण्यात आली,या निवडीचे सर्व श्रेय शिवसेना राळेगाव विधानसभा समन्वयक जानरावजी गिरी,शिवसेना राळेगाव तालुका प्रमुख मनोज भोयर,युवासेनेचे योगेश ठाकरे



यांना दिले,मयुर जुमळे यांच्या नियुक्ती सोबतचं राळेगाव युवासेना विधानसभा प्रमुख पदी ॲड.योगेश ठाकरे,शिवसेना तालुका संघटक पदी समीर येरेकार,राळेगाव शहर प्रमुख पदी निखिल कोवे,शिवसेना उपतालुका प्रमुख पदी अक्षय भोकटे, शिवसेना उपतालुका प्रमुख पदी मयुर तिवाडे,उपतालुका प्रमुख गजानन बुटे,विभाग प्रमुख वाढोणा पं.स.सर्कल पदी आदेश शिंदे,कुणाल हरबडे विभाग प्रमुख खैरी पं.स.सर्कल पदी,विभाग प्रमुख वरध पं.स.सर्कल पदी किशोर कुळसंगे,विभाग प्रमुख झाडगाव पं.स.सर्कल पदी प्रणय भुडे,विभाग प्रमुख धनोरा पं.स.सर्कल पदी लोकेश घोडे,विभाग प्रमुख जळका पं.स.सर्कल पदी पवन महाजन यांची पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन सन्मान करून सर्व महत्वाच्या पदावर निवड करण्यात आली व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या या निवडीचे तालुक्यातुन खुप मोठ्या प्रमाणात कौतुक होत आहे.

**माझ्या सर्व शिवसेना प्रमुख पदाधिकाऱ्यांनी माझ्यावर जो विश्वास टाकून युवासेना तालुका प्रमुख पदी निवड केली व माझ्या सारख्या सामान्य गरीब घरातील मुलाला आज इतकी मोठी जबाबदारी दिली त्याबद्दल मी सर्वांचा ऋणी राहील, आणि पक्षाने जो विश्वास माझ्यावर टाकला त्या विश्वासाला कुठेही तडा जाऊ देणार नाही व युवासेना झपाट्याने वाढविण्यासाठी सदैव प्रयत्न करीन,यांनतर कोणत्याही विध्यार्थी तसेच युवकांवर अन्याय होणार नाही.**
**- मयुर जुमळे युवासेना राळेगाव तालुका प्रमुख**

# पाच फूट लांबीच्या अत्यन्त विषारी नाग व 10.3 फूट लांबीच्या अजगरास पकडून दिले जीवदान



**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

नेरुळ, एमआयडीसी, महात्मा गांधी नगर, ब्लॉक कंपनी मध्ये काम करत असलेल्या कामगारांचा पुनर्वसु फॉउंडेशनला कॉल आला, त्यांनी फोन वरून माहिती दिली की कंपनी परिसरात एक भला मोठा साप फिरत आहे.

पुनर्वसु फॉउंडेशनचे सर्पमित्र शुभम सदानंद भोस्तेकर, गौवर मोहिते व त्यांचे सहकारी मित्र अमृत धनवडे, चेतन मालुसरे, त्वरित घटनास्थळी रवाना झाले. घटना स्थळी पोचल्यावर तिथ कचऱ्याचा खूप साऱ्या गोण्या पडलेल्या दिसल्या. जागा अतिशय कमी वा अडगाळीची होती. सर्वांनी मिळवून अडगळ, कचरा, गोण्या हटवण्यास सुरवात केली, लोकांनी सापाचे व्हिडीओ दाखवले. त्यावरून तो अजगर जातीचा सर्प असल्याचे लक्षात आले, पण अजगरास शोधता शोधता अचानक एका गोणी हलवताक्षणी त्यातून एक भारतीय अत्यंत विषारी नाग जातीचा सर्प फणा काढून समोर उभा राहिला. गौरव व शुभम यांनी अत्यंत सुरक्षितरित्या पब्लिक व सहकारी मित्राना मागे सारून नागाला सुरक्षितरित्या पकडले.

त्या नंतर पुन्हा अजगराचा शोध सुरु केला खूप साऱ्या गोण्या काढून झाल्यावर एका लाकडी भूष्याच्या गोणीखाली अजगराच्या शरीराचा काही भाग दिसला. टीम ने त्वरित सर्व भुस्सा, कचरा हटवून अजगराला देखील सुरक्षित रित्या पकडला.

एवढ्या अडचणीत, कमी जागेत दोन - दोन सापाना सुरक्षित रित्या पकडल्या बद्दल नागरिकानी पुनर्वसू टीम चे कौतुक करत आभार मानले. त्या नंतर दोन्ही सापाना जंगलात सुरक्षितरित्या सोडून देण्यात आले.



Always ready for the justice of every section of the society
YUVA GRAMIN PATRAKAR SANGH
(Reg. No.F-0025416(NND),MH-21-0079739,MH/2025/0496162)
(Area of work :- All over India)
*National President*
Shri Ganesh R. Kachkalwar
Mo.7059371111,7798927777 Email :- yuvagraminpatrakarsangh@gmail.com
Head Office: Plot No. 82 Chhatrapati Sambhajinagar, Tal. Mahur, Dist. Nanded

Date :-30/09/2025

Appointment letter

To,
Name : Mr. Vikas Popat Vayal
Position : District Working President,Mumbai S.
Address : Ghatkopar,Mumbai Shahar
: Maharashtra

You are hereby informed that in recognition of your work in the field of journalism, you have been selected as an officer of the Young Rural Journalists Association and the next executive committee should be selected and the report should be sent to the head office.

Best wishes for your future endeavors!

National President
Shri Ganesh R. Kachkalwar

Note :- The period of appointment will be for one year.

**सुप्रसिद्ध अभिनेते रायटर डिरेक्टर , सह कलाकार दादासाहेब फाळके पुरस्कार 2024 विजेते , दैनिक युवक आधारचे मुंबई प्रतिनिधी पत्रकार व मुंबई प्रदेश कार्याध्यक्ष दादासाहेब फाळके चित्रपट युनियन श्री विकास वायाळ यांची युवा ग्रामीण पत्रकार संघ कार्यक्षेत्र संपूर्ण भारत राष्ट्रीय अध्यक्ष श्री गणेश कचकलवार सर यांच्या मार्फत पत्रकार संघटनेच्या मुंबई प्रदेश कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे**
**( दैनिक युवक आधार )**

# राष्ट्रीय महामार्गावरील अर्धवट कामामुळे नागरिकांचा संताप!

## लिंगा गावाजवळ रिसोड मालेगाव रस्त्याचे ठेकेदारांनी काढले बिल, पण काम अर्धवटच.!

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

**रिसोड-** रिसोड मालेगाव हिंगोली या राष्ट्रीय महामार्गावर लिंगा गावाजवळ करण्यात आलेले रस्त्याचे काम अत्यंत अर्धवट अवस्थेतच सोडल्यामुळे नागरिक आणि वाहनधारकात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

ठेकेदारांनी शासनाचा निधी घेतला असला तरी प्रत्यक्ष काम मात्र पुढे राहिल्याचा आरोप ग्रामस्थांना कडून करण्यात येत आहे. लिंग परिसरातून जाणारा हा राष्ट्रीय महामार्ग रोज शेकडो वाहनाची वाहतूक सांभाळतो.

परंतु रस्त्याच्या मधोमध मोठे खड्डे उघडलेली माती दगड आणि उंच सखल पृष्ठभागामुळे वाहन चालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. एकदा रात्रीच्या वेळी प्रकाश व्यवस्था नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. अनेक ठिकाणी तर पावसाच्या पाण्याने खड्डे खोल झाले असून दोन चाकी वाहनधारकांना संतुलन राखणे कठीण झाली आहे.

ग्रामस्थांचा आरोप आहे की ठेकेदाराने अर्धवट काम करून बिल उचलले असून रस्त्याचे सुधारणा काम दीर्घकाळ बंद ठेवले आहे त्यामुळे नागरिकांच्या तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या हाल अपेष्टा वाढले आहे. विद्यार्थ्यांना शाळे जाण्यासाठी रोज पाणी आणि चिखलातून जावे लागते.



पालक मुलांना शाळेत पाठवताना जीव मोठी धरून पाठवत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान महामार्गाच्या कडेला बस स्थानक नसल्याने विद्यार्थी व प्रवासी दोघांनाही धोका निर्माण झाला आहे. रात्रीच्या वेळी पावसात व विजेच्या कडकडा प्रवाशांना उभे राहण्यासाठी सुरक्षित ठिकाण नाही. गावकऱ्यांनी अनेक वेळा या समस्येबाबत संबंधित विभागाचे लक्ष वेधले असले तरी अद्याप काहीच हालचाल झालेली नाही.

लिंगा गावाजवळ रस्त्यावर योग्य प्रकारे साईन बोर्ड, वळणांची चिन्हे किंवा सूचना फलक लावलेले नाहीत. त्यामुळे बाहेरील वाहन चालकांना अपघाताचा धोका अधिक आहे.

महामार्ग विकासाचे दावे कागदावर आहेत. प्रत्यक्षात मात्र लोकांच्या जीवाशी खेळ सुरू आहे. अशी संतप्त प्रतिक्रिया गावकऱ्यांनी दिली आहे.

गावकऱ्यांची मागणी आहे की, त्वरित रस्त्याचे काम पूर्ण करून सुरक्षित मार्ग तयार करण्यात यावा, बस स्थानक उभारले जावे, आणि प्रत्येक वळणावर तसेच गावाच्या प्रवेशद्वारावर सूचनाफलक लावावे.

या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने तातडीने लक्ष देऊन ठेकेदारावर योग्य कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे .

# चार दिवसीय नॉर्थ-ईस्ट फेस्टिवल "ऑक्टेव्ह" 9 ऑक्टोबरपासून पूर्वोत्तर भारताच्या समृद्ध संस्कृतीचे होणार दर्शन

## 223 कलाकार सादर करणार रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे**

भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या मार्गदर्शनात पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूर आणि दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नॉर्थ-ईस्ट फेस्टिवल "ऑक्टेव्ह" चे भव्य आयोजन 9 ते 12 ऑक्टोबर 2025 दरम्यान नागपूरमध्ये केले जाणार आहे. दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूरच्या प्रांगणात होणा-या या सांस्कृतिक महोत्सवात पूर्वोत्तर भारतातील 223 कलाकार त्यांच्या अद्वितीय सांस्कृतिक सादरीकरणाद्वारे पूर्वोत्तरच्या समृद्ध परंपरा आणि कलांचा अनुभव प्रेक्षकांना देतील.

पूर्वोत्तर भारतातील आठ राज्ये जसे, आसाम, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, सिक्किम आणि त्रिपुरा यांची पारंपरिक संस्कृती जतन करणे, संवर्धन करणे आणि प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने या फेस्टिवलचे आयोजन करन्यात आले आहे.

भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाद्वारे देशाच्या विविध भागात आयोजित होणाऱ्या या ऑक्टेव्ह फेस्टिवलचा उद्देश भारताची सांस्कृतिक वैविधता व्यापक स्तरावर सादर करणे हा आहे, अशी माहिती दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्राच्या संचालक आस्था कार्लेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या चार दिवसीय महोत्सवाचे कार्यक्रमाचे उद्घाटन 9 ऑक्टोबर रोजी संध्याकाळी 6 वाजता गणमान्य अतिथींच्या उपस्थितीत होईल. त्यानंतर पारंपरिक पोशाख शो व लोकनृत्याचे सादरीकरण होणार आहे. 10 ते 12 ऑक्टोबर दरम्यान दररोज संध्याकाळी 6 ते 8 वाजेदरम्यान सांस्कृतिक संध्येचे आयोजन करण्यात येणार असून त्यात बिहू, बारदोई सिकला, होजागिरी, संग्राई मोग, सिंगी छाम, नागा वार नृत्य, काशाद मस्ती, वांगला नृत्य, चेराव नृत्य, पुंग ढोल चोलम, थांगता व चेरोल जोगोई, जूजू जाजा, मणीपुरी रास, सत्रिया नृत्य यांचा समावेश आहे.

**विशेष "बांबू शिल्प कार्यशाळा"**

पूर्वोत्तर भारतात बांबूचा उपयोग घर बांधणी, हस्तशिल्प, संगीत वाद्ये (झांझ, फ्लूट इ.) आणि पारंपरिक




उत्सवात केला जातो. येथील बांबूच्या उत्पादनांना स्थानिक तसेच आंतरराष्ट्रीय बाजारात मोठी मागणी आहे. 9 ते 12 ऑक्टोबर दरम्यान दररोज बांबू शिल्प कार्यशाळा आयोजित केली जाणार असून पूर्वोत्तर भारतातील कुशल कलाकार बांबू पासून विविध शिल्पकृती कशा तयार करायच्या याचे मार्गदर्शन करतील.

**हस्तशिल्प स्टॉल**

पूर्वोत्तर राज्यांतील आकर्षक आणि उपयोगी हस्तशिल्प प्रदर्शित केले जातील. बांबूचे फर्निचर, बास्केट, सजावटी वस्तू, घरगुती साहित्य, लाकूड आणि दगडाचे शिल्प, पारंपरिक कपडे व टेक्सटाईल्स, मातीचे शिल्प, जनजातीय पारंपरिक दागिने इत्यादीचा समावेश राहील. हा मेळा दररोज दुपारी 2 ते रात्री 9 वाजेपर्यंत खुला राहील.

हे सर्व कार्यक्रम नि:शुल्क असतील. दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूरच्या संचालिका श्रीमती आस्था कार्लेकर आणि पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूरचे संचालक श्री फुरकान खान यांनी नागपूर व आसपासच्या नागरिकांना या भव्य उत्सवात उपस्थित राहून पूर्वोत्तर भारताची सांस्कृतिक वैविध्य आणि परंपरा अनुभवण्याचे आवाहन केले आहे.

**कार्यक्रम**

- 9 ऑक्टोबर: उद्घाटन, पारंपरिक पोशाख शो आणि लोकनृत्य
- 10 ऑक्टोबर: लोकनृत्य आणि पारंपरिक पोशाख शो
- 11 ऑक्टोबर: शास्त्रीय मणिपुरी रास नृत्य, सतरिया नृत्य आणि लोकनृत्य
- 12 ऑक्टोबर: सतरिया नृत्य, लोकनृत्य आणि रॉक बँड

# सीकेटी इंटेरिअर डिझाईन विभागाच्या विद्यार्थ्यांची अग्निशमन विभागास शैक्षणिक भेट

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर आर्टस्,कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या(अधिकारप्रदत्त स्वायत्त) इंटेरिअर डिझाईन विभागाच्यावतीने पनवेल मधील अग्निशमक विभागास शैक्षणिक भेट दिली.

विद्यार्थ्यांना या भेटीत अग्निशमन विभागातील तज्ज्ञ अधिकारी शुभम राठोड आणि शिवा अडे यांचे मार्गदर्शन मिळाले. त्यांनी आग लागल्याच्या वेळी वापरली जाणारी उपकरणे, फायर अलार्म सिस्टम्स, विविध प्रकारची फायर एक्स्टिंग्विशर्स आणि सुरक्षित इमारत डिझाईनमध्ये लागणारी फायर सेफ्टी यंत्रणा याबाबत सविस्तर माहिती दिली. ही माहिती विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी तसेच भविष्यातील व्यावसायिक वाटचालीसाठी अत्यंत उपयुक्त



ठरेल. या भेटीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना फायर फायटिंग सेवा, सुरक्षा प्रणाली तसेच आपत्कालीन परिस्थितीत वापरण्यात येणाऱ्या उपाययोजना याविषयी प्रत्यक्ष माहिती मिळवून देणे आणि व्यावहारिक अनुभव प्राप्त करून देणे हा होता. या शैक्षणिक भेटीत इंटेरिअर डिझाईन विभागाच्या विभागप्रमुख प्रा. ए.आर. प्रज्योती देसाई व प्रा. ए. आर. विनय गावंड यांच्यासह एकूण २२ विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रस्तुत कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले

# हिंदी हायस्कूलमध्ये आंतरशालेय कविता वाचन स्पर्धा संपन्न

## मुंबई आणि ठाण्यातील १२ शाळांमधील एकूण २४ स्पर्धकांनी छायावादी कवींच्या कवितांचे केले वाचन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई(शांताराम गुडेकर)**

हिंदी विद्या प्रचार समिती संचालित घाटकोपर (पश्चिम) येथील हिंदी हायस्कूलच्या एमपीएसएस सभागृहात श्रीमती पुष्पाराणी पी.आर. सिंह आंतरशालेय कविता वाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. मुंबई आणि ठाण्यातील १२ शाळांमधील एकूण २४ स्पर्धकांनी छायावादी कवींच्या कवितांचे वाचन केले. घाटकोपर येथील हिंदी हायस्कूलच्या पूजा अशोक कनोजिया हिने प्रथम क्रमांक पटकावला, मालाड येथील केजीएस सर्वोदय विद्यालयाच्या हर्षिता ओम प्रकाश प्रजापती हिने द्वितीय क्रमांक पटकावला, चेंबूर येथील विनोद शुक्ला हायस्कूलच्या साक्षी जगदीश पटेल हिने तृतीय क्रमांक पटकावला आणि केजीएस सर्वोदय विद्यालयाच्या राशी राजनारायण मिश्रा हिने सांत्वन पारितोषिक मिळवले. केजीएस सर्वोदय विद्यालयाला विजेता घोषित करण्यात आले आणि त्यांना एक जंगम ढाल (ट्रॉफी) देण्यात



आली. हिंदी विद्या प्रचार समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र सिंह यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले. शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र कुमार सिंह यांनी सहभागी शाळांच्या समित्या आणि मुख्याध्यापकांचे आभार मानले. प्रमुख पाहुणे माजी प्राचार्य राजदेव सिंह यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना कविता वाचनात रस नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. उपप्राचार्य अभय प्रताप सिंह यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. ज्युरी सदस्य डॉ. बलवंत सिंह, डॉ. चंद्र प्रकाश सिंह आणि अवनीश दीक्षित यांनीही त्यांच्या भूमिका उत्तम प्रकारे पार पाडल्या. श्रीमती रेखा सिंह यांनी सर्व पाहुण्यांचे आणि सहभागी विद्यार्थ्यांचे आभार मानले.

# पत्रकार वर्गाच्या संकल्पनेतून स्वच्छता अभियान ,पर्यावरण जनजागृती मोहीमेत कापडी पिशव्या वाटप

## पत्रकार व विद्यार्थी,जनशिक्षण संस्था तसेच ग्रामपंचायतिचा सहभाग

**दैनिक युवक आधार**
**खालापूर /रसायनी**

सामाजिक संदेश देत स्तुत्य उपक्रमातुंन विविध लोकपयोगी कार्यक्रम राबविणाऱ्या खालापूर तालुका महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेच्या माध्यमातून सणासुदीच्या पार्श्वभूमीवर वासंबे ग्रुप ग्रामपंचायत आणि जनशिक्षण संस्थान (जे.एस.एस) अलिबाग रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायत ते शिवाजी महाराज चौक ,मुख्य बाजारपेठ मधून पत्रकार, संस्था , विद्यार्थी , ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या संयुक्त विद्यमाने मोहोपाडा प्रवेशद्वारापर्यंत स्वच्छता अभियान रॅली काढण्यात आली. यावेळी सामजिक संदेश देणारे बॅनर हातात घेत जनजागृतीच्या माध्यमातून घोषणा देण्यात आल्या.यावेळी सामूहिक "स्वच्छता शपथ घेण्यात आली.तसेच स्थानिक नागरीक ,व्यापारी ,ग्राहक वर्गाला पर्यावरणाचा महत्त्व सांगत कापडी पिशव्यांचे वाटप हि



मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच उमा मुंढे, कल्पना म्हात्रे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी,साधनव्यकी वर्षा रामटेके

जनशिक्षण संस्थान अलिबाग रायगड तसेच ग्रामपंचायत कर्मचारी, शिक्षक,पोलीस कर्मचारी व महाराष्ट्र राज्य पत्रकार

> स्वच्छता मोहिमेला प्राथमिकता देत या स्तुत्यु उपक्रमाचे सातत्य ठेवून पत्रकार बांधवांसारखेच समाजातील सर्व घटकांनी पुढे येऊन आपलें परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी सहभाग घ्यावा व सिंगल न्यूज प्लास्टिक पिशव्या वापरू नये.
> सरपंच उमाताई मुंढे

संघटना सदस्य रायगड जिल्हा अध्यक्ष राकेश खराडे ,तालुका अध्यक्ष अर्जुन कदम, जेष्ठ पत्रकार राहुल जाधव, अमोल सांगळे , प्रतीक चाळके,देवा पवार ,पंढरीनाथ कुरंगले, गौतम सोनवणे, साबीर शेख , बाळाराम केदारी व अन्य पत्रकार बांधवांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेत कार्यक्रम दिमाखदार पध्दतीने यशस्वी केला.यावेळी जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांनी पर्यावरण पूर्वक दिवाळी व अन्य सण साजरे करावे असे सांगत शुभेच्छा दिल्या.

# भूमी अभिलेख विभागातील भूकरमापक संवर्गात 110 पदांसाठी सरळसेवेद्वारे भरती

## 24 ऑक्टोबरपर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्विकारणार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर**

**नागपूर :** भूमी अभिलेख नागपूर विभागांतर्गत गट क श्रेणीतील भूकरमापक संवर्गातील रिक्त असलेली 110 पदे खुल्या व मागासवर्गीय संवर्गातील सरळसेवेने भरण्यात येणार आहे. या पदासाठी 24 ऑक्टोबर 2025 पर्यंत ऑनलाईन अर्ज स्विकारण्यात येणार असल्याची माहिती भूमी अभिलेख विभागाचे उपसंचालक लालसिंग मिसाळ यांनी दिली आहे.

भूकरमापक हे पद एस 6 या वेतनश्रेणीत असून या पदासाठी मान्यताप्राप्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील किंवा मान्यताप्राप्त संस्थेकडील स्थापत्य अभियांत्रिकी पदविका किंवा माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण केल्यानंतर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे दोन वर्षाचे सर्वेक्षक व्यवसायाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

भूमी अभिलेख नागपूर प्रदेश यांच्या अधिपत्याखाली विविध कार्यालयातील भूकरमापक ही रिक्त पदे भरण्यासाठी सरळसेवेने विहित अर्हता धारण करत असलेल्या पात्र उमेदवारांकडून स्पर्धात्मक परिक्षेसाठी केवळ ऑनलाईन पद्धतीने विभागाच्या https://ibpsreg.ibps.in/gomsep२५/ व https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज स्विकारण्यात येणार आहे. या भर्तीसाठी 13 व 14 नोव्हेंबर 2025 रोजी ऑनलाईन परिक्षा घेण्यात येणार आहे. परिक्षेसाठी आर्हता, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया आदी सविस्तर संकेतस्थळावरच उपलब्ध करून देण्यात आली आहे. ऑनलाईन शुल्क भरण्याच्या कालावधी दिनांक 24 ऑक्टोंबर 2025 पर्यंत आहे.

या पदासाठी प्रस्तावित परिक्षा दिनांक 13 व 14 नोव्हेंबर 2025 रोजी घेण्यात येणार आहे. नियोजनाच्या दृष्टीने परिक्षेच्या तारखेमध्ये बदल होवू शकतो, अशी माहिती भूमि अभिलेख विभागाचे उपसंचालक लालासिंग मिसाळ यांनी दिली.

# मित्रानेच केला प्राणघातक हल्ला! विंचूरमध्ये चाकूने मित्रावर वार – आरोपी अटकेत

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी जनार्दन चव्हाण**

विंचूर शहरात धक्कादायक प्रकार घडला असून मित्रानेच आपल्या मित्रावर प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली आहे. ही घटना विंचूर येथील मारवाडी पेठ परिसरात सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास घडली.

व्यापारी पवन नंदकुमार जाजू हे आपल्या घरासमोर उभे असताना विंचूर येथील मनोज बोराडे हा तेथे आला व काही कारणावरून त्यांच्याशी वाद घालत अचानक धारदार चाकूने वार केले. या हल्ल्यात पवन जाजू गंभीर जखमी झाले असून त्यांना स्थानिक नागरिकांनी तात्काळ लासलगाव येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, जखमा गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना नाशिक येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

घटनेनंतर आरोपी मनोज बोराडे हा घटनास्थळावरून फरार झाला होता. तथापि, लासलगाव पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत आरोपीला ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.



प्राथमिक माहितीनुसार, पवन जाजू आणि मनोज बोराडे हे दोघेही मित्र असून काही वैयक्तिक कारणावरून हा वाद निर्माण झाला असल्याची माहिती समोर आली आहे. विंचूर परिसरात या घटनेने खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# झाडगाव येथे उमेद ग्रामीण जीवननोत्ती अभियान अंतर्गत सावली महिला प्रभास संघ,वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**

**राळेगाव:**-दि.३ऑक्टोबर २०२५ रोजी झाडगाव येथील संत तुकडोजी महाराज मंदिर परिसरात सावली महिला प्रभात संघ, वरध प्रभाग यांची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. या सभेला परिसरातील महिला बचतगट सदस्य,मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित मा.प्रा.अशोक उईके, आदिवासी विकास मंत्री यांनी महिलांना प्रेरणादायी मार्गदर्शन करताना सांगितले की "आर्थिक स्वावलंबनासाठी छोट्या छोट्या बचतीतून मोठे उत्पन्न मिळविता येते. बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी केवळ घर चालवण्यापुरतेच नव्हे तर समाज उभारणीतही मोठे योगदान द्यावे. तुमच्या उपक्रमांना माझे नेहमीच पाठींबा राहील."त्याचबरोबर तहसीलदार अमित भोईटे, तालुका व्यवस्थापक मिलिंद चोपडे व गटविकास अधिकारी केशव पवार यांनीसुद्धा महिलांना मार्गदर्शन केले. सभेचे सूत्रसंचालन सौ.कविता धुर्वे यांनी



केले तर प्रास्ताविक वैशाली पटेलपैक यांनी केले,ऑडिट वाचन लेखापाल वर्षाताई यांनी केले, तर प्रभाग समन्वयक दिनेश कोवे यांनी आभार मानले.यावेळी विशेष उपक्रम म्हणून वरध प्रभाग तर्फे आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना भेटवस्तूंचे वाटप करण्यासाठी मा. आदिवासी मंत्री अशोक उईके यांना भेटवस्तू देण्यात आली.कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांमध्ये सतीश टारपे (मुख्य व्यवस्थापक) इंडियन बँक झाडगाव, केशव पवार (गटविकास अधिकारी),माजी नगराध्यक्ष बबन भोंगारे,चित्तरंजन कोल्हे (जि.प. सदस्य), माजी प्रभाग संघ अध्यक्ष सीमा आष्टकर, सचिव सोनाली उताणे,छायाताई पिंपरे,रामदासजी किन्नाके,उषाताई भोयर,प्रशांत तायडे, डॉ.कुणाल भोयर,सविता पोटदुखे, शोभाताई इंगोले, प्रवीण कोकाटे, सुनील जिड्डेवार,प्रकाश पाल,प्रभात संग अध्यक्ष,सोनाली पटेलपैक, सचिव रत्नमाला आडे,कोषाध्यक्ष मंगलाताई लढे,मिलिंद चोपडे,धन्वंत शेंडे,दिनेश कोवे,अविनाश तरडे,गजानन आत्राम, प्रफुल पटेलपैक,वैशाली पटेलपैक, वर्षा वाघरे,कविशर लडी,मंगेश पुडके, जीवन कुमरे,काशिनाथ भगत, श्यामलाल येडस्कर तसेच गावातील महिला बचतगट सदस्य व ग्रामस्थ यांचा उत्स्फूर्त सहभाग होता.या सभेमुळे महिला बचतगटांना नवे बळ मिळाले असून गावातील महिला आर्थिक,सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात अधिक प्रगत होण्यासाठी प्रेरित झाल्या आहेत.

# एअरटेल बिझनेसला भारतीय रेल्वे सुरक्षा संचालन केंद्र (आयआरएसओसी) साठी मिळाला बहुवर्षीय करार

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग**

• एअरटेल एक नवी, बहुस्तरीय सायबर सुरक्षा प्रणाली उभारेल आणि ती वर्षभर, दिवसाचे 24 तास अखंडपणे कार्यरत ठेवेल. ही प्रणाली भारतीय रेल्वेच्या आयटी नेटवर्कला सायबर धोका पासून संरक्षित करण्यासाठी एक मजबूत सुरक्षा कवच म्हणून काम करेल, ज्यामुळे रेल्वेच्या सर्व डिजिटल सेवा सुरक्षित, सुरळीत आणि अखंड चालू राहतील.

• या नव्या डेटा सुरक्षा व्यवस्थेमुळे 1 अब्जांहून अधिक भारतीयांना लाभ होईल. यामुळे तिकीट बुकिंग, ऑनलाइन पेमेंट, ट्रेन ट्रॅकिंग आणि रेल्वेशी संबंधित इतर डिजिटल सेवा आणखी सुलभ आणि सुरक्षित होतील.

एअरटेल बिझनेसला भारतीय रेल्वे सुरक्षा संचालन केंद्र (आयआरएसओसी) कडून एक बहुवर्षीय करार मिळाला आहे, ज्याअंतर्गत एअरटेल भारतीय रेल्वेच्या डिजिटल नेटवर्कच्या सुरक्षेसाठी अत्याधुनिक आणि व्यापक सायबर सुरक्षा सेवा प्रदान करेल.

भारतीय रेल ही देशातील सर्वात मोठ्या आणि महत्त्वाच्या सेवांपैकी एक आहे. दररोज ती 13,000 हून अधिक गाड्या चालवते, 2 कोटींपेक्षा अधिक प्रवाशांना प्रवासाची सुविधा देते आणि लाखो डिजिटल व्यवहार पूर्ण करते. याशिवाय, ती दरवर्षी 1.5 अब्ज टनांहून अधिक माल देशभर पोहोचवते. अशा परिस्थितीत प्रवाशांची वैयक्तिक माहिती, पेमेंटशी संबंधित डेटा आणि रेल्वेचे कामकाज — जसे की तिकीट बुकिंग, ट्रेन ट्रॅकिंग, माल वाहतूक आणि सिग्नलिंग — यांशी संबंधित माहिती सुरक्षित ठेवणे अत्यंत आवश्यक आहे, विशेषतः अशा काळात जेव्हा सायबर हल्ल्यांचा धोका सतत वाढत आहे.

एअरटेल बिझनेस भारतीय रेल्वेच्या विशाल डेटाबेसचे संरक्षण करण्यासाठी एक मजबूत आणि बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्था उभारेल. ही प्रणाली सर्व सुरक्षा नियंत्रणांना एकाच ठिकाणाहून व्यवस्थापित करेल, ज्यामुळे रेल्वेच्या डिजिटल सेवा — ज्यामध्ये देशभरातील 26 ठिकाणी कार्यरत सुमारे 1,60,000 कर्मचारी सहभागी आहेत — सतत सुरक्षित आणि अखंड चालू राहतील.

या प्रकल्पात अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानांचा वापर केला जाईल, जे जगभरात सर्वात विश्वासार्ह मानले जातात. त्यासोबतच "मेक इन इंडिया" अंतर्गत विकसित केलेली नवी भारतीय सायबर सुरक्षा तंत्रज्ञानेही समाविष्ट केली जातील. या सर्वांच्या साहाय्याने एअरटेल अशी एक स्मार्ट सुरक्षा प्रणाली उभारेल, ज्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) च्या मदतीने सायबर धोक्यांची ओळख आणि प्रतिबंध केला जाईल. ही व्यवस्था देशाच्या महत्त्वपूर्ण पायाभूत संरचनेचे — जसे की रेल्वेचे — सर्व प्रकारच्या डिजिटल धोक्यांपासून संरक्षण करण्यासाठी तयार केली जात आहे.

शरद सिन्हा, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संचालक – एअरटेल बिझनेस यांनी सांगितले,

"आजच्या काळात सायबर हल्ल्यांचा धोका सतत वाढत आहे. अशा परिस्थितीत रेल्वेसारख्या मोठ्या व्यवस्थेसाठी आपल्या डेटा, संचालन आणि प्रवाशांच्या सुरक्षेला बळकट ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. एअरटेल बिझनेसमध्ये आम्हाला ठाऊक आहे की अशा धोक्यांपासून बचाव करण्यासाठी प्रगत सुरक्षा प्रणाली किती आवश्यक असतात. आम्हाला अभिमान आहे की आयआरएसओसीने आम्हाला आपला विश्वासू भागीदार म्हणून निवडले आहे, ज्यामुळे आम्ही भारतीय रेल्वेसारख्या विशाल डिजिटल प्रणालीचे — ज्यामध्ये देशभरातील नेटवर्क आणि डेटा समाविष्ट आहे — सुरक्षिततेसाठी योगदान देऊ शकतो. आमची सुरक्षा व्यवस्था तिकीटिंग आणि डेटा व्यवस्थापन अधिक मजबूत करेल, रेल्वेच्या डिजिटल कामकाजाला सायबर धोक्यांपासून सुरक्षित ठेवेल आणि दररोज प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांना सुरक्षित व अखंड डिजिटल सेवा प्रदान करेल."

दिलीप कुमार, ईडीआयपी – रेल्वे बोर्ड यांनी सांगितले,

"आज रेल्वेच्या कामकाज, देखभाल, उत्पादन आणि संसाधनांच्या खरेदीमध्ये डिजिटल माहिती आणि संवाद तंत्रज्ञानावर अवलंबित्व मोठ्या प्रमाणात वाढले आहे. अशा परिस्थितीत सायबर सुरक्षा अत्यंत आवश्यक बनली आहे. आयआरएसओसीच्या स्थापनेमुळे एक केंद्रीकृत सुरक्षा संचालन केंद्र उभारले जाईल, जे भारतीय रेल्वेच्या डिजिटल मालमत्तेची सातत्याने निगराणी करेल, सायबर धोक्यांची ओळख पटवेल आणि त्यावर तत्काळ कारवाई करेल. हे केंद्र सायबर धोक्यांशी संबंधित माहिती गोळा करेल आणि राष्ट्रीय सायबर सुरक्षा संस्थांशी समन्वय साधून काम करेल. तसेच, माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित संसाधनांच्या संचालन आणि देखभालीचे सुयोग्य नियोजन केल्यामुळे रेल्वेच्या सेवांमध्ये अधिक सुधारणा होईल आणि प्रवाशांना कोणत्याही व्यत्ययाशिवाय सेवा मिळत राहतील."

एअरटेल सिक्योरच्या माध्यमातून भारतीय रेल्वेला एक केंद्रीकृत सुरक्षा प्रणाली मिळेल, जी अनेक प्रकारचे फायदे प्रदान करेल:

• एकात्मिक देखरेख आणि अनुपालन (युनिफाइड कॉम्प्लायन्स अँड व्हिजिबिलिटी): एअरटेलने असा डॅशबोर्ड विकसित केला आहे, जो रेल्वेच्या 26 हून अधिक ठिकाणांवरील सर्व सुरक्षा प्रणालींची एकाच ठिकाणाहून देखरेख करण्यास आणि त्यांच्या स्थितीचे रिअल-टाइम निरीक्षण करण्यास सक्षम आहे.

• उन्नत एंडपॉइंट सुरक्षा (ॲडिव्हान्स्ड एंडपॉइंट प्रोटेक्शन): ही एक एआय-संचालित सायबर सुरक्षा प्रणाली आहे, जी रेल्वेतील सर्व संगणक, सर्व्हर आणि उपकरणांवर सातत्याने नजर ठेवते आणि त्यांना सुरक्षित ठेवते.

• मजबूत पॅच आणि असुरक्षा व्यवस्थापन (रॉबस्ट पॅच अँड व्हल्नरेबिलिटी मॅनेजमेंट): रेल्वेच्या 26 प्रमुख आणि उपकेंद्रांवरील 1,90,000 हून अधिक महत्त्वाच्या उपकरणे आणि डिजिटल साधनांची देखरेख एका एकात्मिक विंडोमधून केली जाईल, ज्यामुळे कोणतीही तांत्रिक कमतरता किंवा संभाव्य धोका त्वरित ओळखता येईल.• पुढील पिढीची निरीक्षण प्रणाली (नेक्स्ट-जेन मॉनिटरिंग): यात एआय-संचालित तंत्रज्ञानांचा समावेश आहे, जसे की एसआयईएम, एसओएआर आणि यूईबीए, जे मशीन लर्निंग आणि वर्तन विश्लेषणाच्या मदतीने सायबर धोक्यांची ओळख, पूर्वानुमान आणि प्रतिबंध रिअल-टाइममध्ये करतात. ही प्रणाली 20 सेकंदांपेक्षा कमी वेळात धोका ओळखण्यास सक्षम आहे. तसेच, थ्रेट इंटेलिजन्स आणि डार्क वेब मॉनिटरिंगच्या माध्यमातून संभाव्य धोक्यांची आधीच ओळख करून त्यांचा रेल्वेच्या कामकाजावर परिणाम होण्यापूर्वीच प्रतिबंध केला जाईल.

• मजबूत नेटवर्क आणि प्रवेश नियंत्रण: फायरवॉल, राउटर, एमपीएलएस नेटवर्क आणि सुरक्षित लॉगिन प्रणाली यांसारख्या तंत्रज्ञानांच्या साहाय्याने रेल्वेच्या सर्व महत्त्वाच्या डिजिटल अनुप्रयोग आणि नेटवर्कचे संरक्षण केले जाईल.

## बीड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिकाचे प्रचंड नुकसान – सोलर यंत्रणाही ठप्प

**दैनिक युवक आधार**
**उपसंपादक महाराष्ट्र-राजु शिंदे**

बीड : गत काही दिवसांपासून बीड जिल्ह्यात सलग मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी नाले, ओढे, आणि लहान धरणे भरून वाहत आहेत. सततच्या पावसामुळे सोयाबीन पिक पूर्णपणे पाण्याखाली गेले असून मोठ्या प्रमाणात कुजण्यास सुरुवात झाली आहे.

कृषी विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार बीड तालुका, अंबाजोगाई तालुक्यातील धानोरा बु गावातील बन्सी एकनाथ फोलाने शेतकऱ्यांच्या सोयाबीन पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी सोलर पॅनल्स, पंप, आणि सिंचन यंत्रणा पाण्याखाली गेल्याने वीजपुरवठा खंडित झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांना दुहेरी फटका बसला आहे.

स्थानिक प्रशासनाकडून पंचनामे सुरू असून, शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे शेतकरी संघटनांनी मागणी केली आहे.

शेतकऱ्यांनी सरकारकडे तातडीने नुकसान भरपाई



व सोलर यंत्रणा दुरुस्तीची मदत देण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाअंतर्गत बांधकाम कामगारांचे कौशल्य प्रशिक्षण; ग्रामपंचायत पिपरी चा उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा** - महाराष्ट्र शासनाच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाला सुरुवात झालेली आहे. या अभियानाचे मुख्य घटक सुशासन युक्त पंचायत, सक्षम पंचायत, जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव निर्माण करणे, मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण करणे, गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण करणे, लोकसहभाग व श्रमदान माध्यमातून लोकचळवळ निर्माण करणे, इत्यादी शासकीय उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानाचा भाग म्हणून पिपरी पुनर्वसन येथे ग्रामपंचायत पिपरी व महाराष्ट्र इमारत बांधकाम कामगार कल्याण विभाग भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने बांधकाम कामगार कौशल्य



विकास वृद्धीकरण प्रशिक्षण कार्यक्रम ग्रामीण भागातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना कौशल्य प्रशिक्षण व त्यावर आधारित परीक्षा ग्रामपंचायत समाजभवन पिपरी येथे नुकतेच घेण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये बांधकाम कामगारांना बांधकामासंबंधी प्रशिक्षण देण्यात आले व बांधकामावर आधारित परीक्षा घेण्यात आली. या प्रशिक्षण कालावधीमध्ये पिपरी येथील व परिसरातील दोनशे बांधकाम कामगारांनी प्रशिक्षण घेतले व त्यांना महाराष्ट्र इमारत बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या विविध योजनांची उपयुक्त माहिती देण्यात आली. प्रशिक्षणार्थी बांधकामगारांना पंकज हुकरे, मिथुन कढव यांनी प्रशिक्षण दिले. व परीक्षक म्हणून प्रमोद बुटले व प्रज्वल चाहाकार यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. हा उपक्रम यशस्वी करण्याकरिता सरपंच देविदास ठवकर, माजी सरपंच व ग्रा.पं सदस्य नाशिक चवरे, भाऊ कातोरे, संदीप तितीरमारे, जितेंद्र गजभिये उपसरपंच सालेबर्डी, ग्रा.पं कर्मचारी शिवदास शेंडे, संगणक परिचालक विवेक घुले, आशा सेविका कुंदा चवरे, प्रफुल रामटेके, अनिल मडामे, आदींनी मोलाचे सहकार्य केले. हा अभिनव उपक्रम ग्राम पंचायत पिपरीच्या पुढाकारातून घेण्यात आला.

# बीडच्या लेखकाचा ठाण्यात गौरव....

## डॉ. विठ्ठल जाधव यांच्या 'रानरांगूळ' कथासंग्रहास राज्य साहित्य पुरस्कार

**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे यांच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठीत राज्यस्तरीय श्रीस्थानक साहित्य पुरस्कार शिरूरचे साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांच्या 'रानरांगूळ' या कथासंग्रहास ठाणे येथे सुप्रसिद्ध साहित्यिक नीरजा आणि महाराष्ट्र राज्य ग्रंथ संचालनालयाचे सहायक संचालक प्रशांत पाटील यांचे हस्ते दि. ५ रोजी सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. वि.ल. भावे यांनी एकशे तीस वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या ग्रंथ संग्रहालयाच्या वतीने उत्कृष्ट मराठी साहित्यकृतीसाठी राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान केले जातात. डॉ विठ्ठल जाधव यांच्या 'रानरांगूळ' या वास्तववादी कथासंग्रहास सन




२०२४ साठी मेधा दामोदर रोमण पुरस्कृत पुरस्काराने गौरविण्यात आले. साहित्यिक नीरजा म्हणाल्या की, बदलते वातावरण आपल्या संस्कृतीला मारक आहे. आम्ही सांगतो तेच लिहा ही प्रवृत्ती घातक आहे. तर डॉ. विठ्ठल जाधव यांनी माणूस केंद्रीभूत ठेवून माणूसपणाचे प्रश्न हाताळतो. आम्ही जगतो तेच मांडतो असे पुरस्कारास उत्तर देताना म्हटले. पुरस्कार स्वरूप मानपत्र, पाच हजार, ग्रंथभेट देऊन जाधव यांना सन्मानित केले. यावेळी ग्रंथ संग्रहालयाचे अध्यक्ष विद्याधर ठाणेकर, महाराष्ट्र राज्य शासन ग्रंथ निवड समितीचे सदस्य चांगदेव काळे, बालसाहित्यिक बबन शिंदे, नागू वीरकर, मोतीराम राठोड, संकेत जाधव यांचेसह राज्यातील लेखक, कवी, रसिक उपस्थित होते.

## स्वदेस फाउंडेशन संलग्न विर एकलव्य गाव विकास समिती बिवळ येथील ग्रामस्थांचा कोटंबी येथे अभ्यास दौरा

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले, सुरगाणा**

सुरगाणा तालुक्यातील ग्रामपंचायत बिवळ येथील सरपंच, सदस्य, व ग्रामस्थांनी दि- 5 ऑक्टोबर रोजी आदर्श गाव म्हणून प्रसिद्ध असलेल्या कोटंबी गावाचा अभ्यास दौरा केला.या अभ्यास दौऱ्याचे आयोजन विर एकलव्य गाव समिती बिवळ यांच्या संयुक्त विद्यमाने गावातील सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने प्रेरणा घेण्यासाठी करण्यात आले होते. कोटंबी गावाने जलसंधारण, स्वच्छता, महिला सक्षमीकरण, हरितग्राम, सौरऊर्जा वापर, तसेच ग्रामविकासातील सहभागात्मक निर्णयप्रक्रियेच्या माध्यमातून आदर्श गाव म्हणून आपले स्थान निर्माण केले आहे.

विर एकलव्य गाव समिती आणि बिवळ ग्रामस्थांनी गावातील विविध प्रकल्पांची पाहणी केली. विशेषतः पाणलोट क्षेत्र विकास, गावसभा प्रणाली,



महिला बचतगटांचे काम, आणि जैविक शेतीविषयी माहिती घेतली. कोटंबीच्या गावातील परिवर्तन गाव विकास समिती अध्यक्ष देविदास धूम,सचिन पवार, कुमार जाधव, यांनी पाहुण्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.या दौऱ्यात बिवळ ग्रामपंचायतीचे सरपंच हेमलताताई हेमंत भुसारे , सदस्य वनिता पुंडलिक भोये, पेसा अध्यक्ष हेमंत भुसारे,कृषी मित्र परसराम थोरात, विर एकलव्य गाव समिती अध्यक्ष -भागवत पवार, कोषाध्यक्ष -कैलास महाले,सदस्य -नंदा चौधरी तसेच अशोक भोये,हेमंत मोरे, गावातील नागरिक उपस्थित होते. अभ्यास दौऱ्यानंतर ग्रामस्थांनी आपल्या गावातही कोटंबीप्रमाणे योजना राबविण्याचा निर्धार व्यक्त केला.हा अभ्यास दौरा ग्रामविकासाच्या दृष्टीने अत्यंत फलदायी ठरल्याचे मत अनेक ग्रामस्थांनी व्यक्त केले.

## वृद्धत्वकालीन एकाकीपणा दूर करण्यासाठी छंद आणि सकारात्मक दृष्टिकोनाची गरज – डॉ. राजेंद्र बगाटे



**दैनिक युवक आधार**
**नाशिक वार्ताहर**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन आणि सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने १ ऑक्टोबर रोजी साजऱ्या होणाऱ्या 'आंतरराष्ट्रीय वृद्धत्व दिनानिमित्त' विशेष संवाद कार्यक्रम "वृद्धत्व-एक सिंहावलोकन : समस्या व उपाय" या विषयावर यशवाणी वेब रेडिओवर आयोजित करण्यात आला होता. मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे आणि प्र-कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या कल्पक मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या १४ व्या पुष्प परिसंवादात समाजशास्त्राचे आणि वृद्धत्वशास्त्राचे अभ्यासक डॉ. राजेंद्र बगाटे यांनी वृद्धत्त्वाचे सामाजिक, सांस्कृतिक, मानसशास्त्रीय आणि जीवशास्त्रीय पैलू सखोलपणे मांडले.

डॉ. राजेंद्र बगाटे यांनी आपल्या संवादात सांगितले की, "वृद्धत्व ही केवळ जैविक प्रक्रिया नसून जीवनातील अनुभव, ज्ञान आणि संयमाचा साठा आहे. भारताच्या संविधानानुसार ६० वर्षांवरील व्यक्ती 'ज्येष्ठ नागरिक' म्हणून ओळखल्या जातात. या काळात शरीरातील पेशींची पुनर्निर्मिती मंदावते, हाडांची व स्नायूंची ताकद घटते, आणि ज्ञानेंद्रियांची कार्यक्षमता कमी होते; पण त्याचवेळी भावनिक परिपक्वता, सहिष्णुता आणि शहाणपणा वाढतो. या गुणांचा समाजहितासाठी उपयोग झाला पाहिजे." डॉ. बगाटे पुढे म्हणाले की, "वृद्धत्वाच्या काळात सामाजिक, आर्थिक आणि मानसिक आधाराची गरज सर्वाधिक असते. संयुक्त कुटुंबपद्धतीच्या ऱ्हासामुळे आणि शहरीकरणामुळे वृद्ध एकाकी पडले आहेत. त्यामुळे त्यांनी 'मी मी'च्या कवचातून बाहेर येऊन छंद जोपासावेत, समाजाशी संवाद वाढवावा, आणि सक्रिय जीवन जगावे. छंद जोपासल्याने मानसिक ताजेपणा टिकतो व आत्मसन्मान वाढतो."

डॉ. राजेंद्र बगाटे यांनी पुढे अधोरेखित केले की, "रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्यामुळे वृद्धांनी संतुलित आहार, नियमित विहार, आणि तणावरहित जीवनशैली स्वीकारावी. सामाजिक बदल, आर्थिक आव्हाने आणि पर्यावरणीय अस्थिरतेला सकारात्मकतेने सामोरे जाणे आवश्यक आहे. स्वावलंबन ही वृद्धांच्या आत्मसन्मानाची गुरुकिल्ली आहे." डॉ. बगाटे म्हणाले की, "वृद्धांनी स्वतःची ओळख निष्क्रियतेत नव्हे तर साक्रीयतेत शोधली पाहिजे. आरोग्याविषयी जागरूकता, सामाजिक सहभाग, नव्या तंत्रज्ञानाचे ज्ञान, संवादकौशल्य आणि सतत शिकण्याची वृत्ती या गोष्टी वृद्धत्व अधिक अर्थपूर्ण करू शकतात." या संवादाद्वारे वृद्धत्वाचे समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय, आर्थिक आणि सांस्कृतिक पैलू स्पष्ट करण्यात आले. वृद्धांच्या समस्या समजून घेऊन त्यांच्या सन्मानाचे आणि स्वावलंबनाचे धोरणात्मक प्रयत्न गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले. वृद्धांच्या समस्यांविषयी संवेदनशीलता निर्माण करण्याचा आणि समाजात सकारात्मक दृष्टिकोन वाढविण्याचा हा उपक्रम ठरला आहे.

कार्यक्रमाचे संयोजन आणि निवेदन अध्यासन प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले. त्यांनी या संवाद मालिकेचे उद्दिष्ट आणि महत्त्व स्पष्ट केले. या परिसंवादाच्या यशस्वी आयोजनात श्री. राहुल पगारे यांनी विशेष परिश्रम घेतले, तर दृक्-श्राव्य केंद्राचे प्रमुख प्रा. जदीप निकम यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक सहाय्यक श्री. गिरीश गवळी आणि श्री. प्रकाश सापनर यांनी तांत्रिक सहकार्य केले. हा संवाद यशवाणी वेब रेडिओच्या पोर्टलवर अध्ययनार्थी व श्रोत्यांसाठी कायमस्वरूपी श्रवणासाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

# अखिल भारतीय समस्त कक्कया समाज महासंघाची वार्षिक सर्वसाधारण बैठक संपन्न!

**दैनिक युवक आधार**
**मुंबई :(दत्ता खंदारे )**

अखिल भारतीय समस्त कक्कया समाज महासंघाची वार्षिक सर्वसाधारण बैठक गुंडेचा अनेक्स, साकीनाका येथे संपन्न झाली.

प्रथम मान्यवर पाहुणे व केंद्रीय कार्यकारिणी पदाधिकारी यांचा सन्मान करुन तसेच दीप प्रज्वलन करून सर्व महात्मे यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून जय घोष केला.पहेलगाम काश्मीर मधे अतिरेकी हल्ल्यात जे बळी पडले त्यांना दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली वाहिन्यात आली.महासंघांचे अध्यक्ष निवृत्ती सावळकर यांच्या मातोश्री सुंदरबाई काशिनाथ सावळकर, कार्याध्यक्ष श्री हनुमंत सोनावणे यांच्या मातोश्री शांताबाई शिवाजी सोनावणे यांचे नुकतेच दुःखद निधन झाले त्यांनाही महासंघाच्या वतीने दोन मिनिट स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहण्यात आली.

या सभेचे अध्यक्ष म्हूणन निवृत्ती सावळकर यांचे नाव नवनाथ कोकणे उपाध्यक्ष यांनी सुचवले आणि चंद्रकांत कोकणे यांनी अनुमोदन दिले. सूत्रसंचालक शशिकांत सोनावणे यांनी तसे जाहीर केले.सर्व उपस्थित समाज बांधवानी त्यास एकमताने सहमती दिली.

मागील वार्षिक साधारण सभेच्या(ऐजिएम )इतिवृतांचे



वाचन श्री प्रकाश दरवेशी यांनी केले आणि त्यावर रीतसर चर्चा करण्यात आली.सर्व शंका आणि विषय यांचे निरसन झाले आणि सर्वांनी एकमुखी होकार देऊन ते पारित करण्यात आले.

प्रास्ताविक मध्ये श्री प्रकाश दरवेशी सरचिटणीस यांनी मुद्देसूद विचाराने महासंघ च्या वाटचाली बद्दल सांगितले. महासंघाचा २०२४-२५ चा लेखा जोखा तयार असल्याचे जाहीर करण्यात आले. महासंघाचे अखिल भारतीय समस्त ककक्या समाज महासंघ असे नामकरण करण्यात आले असून त्याचे मुख्यालय मुंबई राहील असे सूचित करण्यात आले. तसेच यावेळी मुबंई, महाराष्ट्रासह,तेलंगना, कर्नाटक, गुजरातसह अन्य राज्यात केंद्रीय कार्यकारणी आणि पदाधिकारी यांची एकमताने निवड करण्यात आली.

यावेळी केंद्रीय कार्यकारिणीत हनुमंत सोनावणे (कार्याध्यक्ष केंद्रीय कार्यकारिणी), चंद्रकांत कोकणे (सोलापूर जिल्हा प्रभारी, निरीक्षक ), नवनाथ कोकणे (लातूर जिल्हा प्रभारी,निरीक्षक ), शशिकांत सोनावणे (मुंबई प्रदेश प्रभारी,निरीक्षक ), सुखदेव शिंदे (सह सचिव केंद्रीय कार्यकारिणी ), दत्ता खंदारे (प्रसिद्धी प्रमुख ),मुकुंद सोनटक्के (जिल्हा अध्यक्ष अहिल्यानगर ), सुरेश कावळे (सोलापूर, सचिव केंद्रीय कार्यकारिणी )यांची निवड करण्यात आली. तर मुंबई तून राम कोकणे (अध्यक्ष मुंबई प्रदेश, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य ),संदेश शिंदे (कार्याध्यक्ष मुंबई प्रदेश ),संजय शिंदे (सचिव मुंबई प्रदेश ),शंकर इंगळे (अध्यक्ष ईशान्य जिल्हा मुंबई )रुपचंद नारायणकर (अध्यक्ष उत्तर जिल्हा मुंबई ),गौतम व्हटकर (अध्यक्ष दक्षिण मध्य मुंबई ),गणेश चौगुले (अध्यक्ष वायव्य जिल्हा मुंबई ),नवनाथ शिंदे (अध्यक्ष दक्षिण जिल्हा मुंबई ),लहू कोकणे (अध्यक्ष उत्तर जिल्हा मुंबई ), पुणे जिल्हातून गोपीनाथ किसन सदाफुले (उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य )यांची निवड करण्यात आली. तसेच कर्नाटक राज्यातून महादेव पोळ (अध्यक्ष कर्नाटक राज्य ),सौ.अश्विनी श्रेयकर (अध्यक्ष महिला कर्नाटक राज्य )प्रकाश सोनावणे (केंद्रीय कार्यकारिणी सदस्य -बेंगलोर ),विनायक घोडके (केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, हुबळी ),चिदानंद पोळ (केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, विजापूर ),मनोहर कदम (केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, बागलकोट ),अनिल हुटगी (केंद्रीय कार्यकारिणी सदस्य,बेळगांव ) यांची निवड झाली तर गुजरात राज्यातून परमेश्वर सोनावणे (अध्यक्ष गुजरात राज्य -बरोडा ),विशाल शिंदे (केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, अमदाबाद ),तेलंगणा राज्यातून दत्तू पोळ (अध्यक्ष तेलंगणा राज्य -हैद्राबाद ),विनोद चौगुले (केंद्रीय कार्यकारिणी सदस्य,हैद्राबाद)यांची एकमुखाने निवड करुन अभिनंदन करण्यात आले.

यावेळी डॉक्टर पांडुरंग पोळ(उपाध्यक्ष) शिवलिंग व्हटकर (जेष्ठ समाजसेवक)आदी मान्यवरांनी आपले विचार माडून समाजाच्या पुढील वाटचाली साठी योग्य मार्गदर्शन केले.

यावेळी अध्यक्ष श्री निवृत्ती सावळकर,कार्यअध्यक्ष हनुमंत सोनावणे,सरचिटणीस प्रकाश दरवेशी, खजिनदार मनोज शिंदे यांनी नवनिर्वाचित पदाधिकारी यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आणि महासंघाचा प्रचार आणि प्रसार देशभर करुन समाजाला न्याय मिळवून देण्याचा पुरेपूर प्रयत्न करावा असे मनोगत व्यक्त केले.


सर्व साधारण सभेसाठी मुंबई, लातूर, सोलापूर, पुणे, धाराशीव, कर्नाटक, तेंलगना, गुजरात, व महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातुन सभासद आले होते.

---

## कवी शाम बैसाणे यांचा अभिलाषा कविता संग्रहाचे प्रकाशन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी**

पांचपीर ट्रस्ट कार्यक्षेत्र भारत आयोजित शाम परशुराम बैसाणे लिखित अभिलाषा काव्यसंग्रह पुस्तक प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत शिवा इंगोले यांच्या हस्ते व अध्यक्षतेखाली रविवार दिनांक १२/१०/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता पासपोली बीएमसी शाळा, आयआयटी क्षेत्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान पवई, मुंबई येथे संपन्न होणार असून या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते भटू जगदेव ( प्रकाशक अनित्य प्रकाशन/ साहित्यिक), जीवनसंघर्षकार फेम नवनाथ रणखांबे ( साहित्यिक / विचारवंत ), ॲड. नाना अहिरे ( प्रसिद्ध विधितज्ञ ), प्रा. गीता मोदले ( रुईया कॉलेज ), बाबा बोऱ्हाडे ( समाज सेवक) असून सोहळयाचे प्रास्ताविक डॉ. सुशील बैसाणे, सूत्रसंचालन आशा रणखांबे (मुख्याध्यापिका अनुदानित आश्रम शाळा बाबरे / जिल्हास्तरीय सदस्या पोलीस महिला दक्षता कमिटी ठाणे) आणि आभार डॉ. संतोष मालुसरे (महाबळेश्वर ) करणार आहेत . या प्रसंगी धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्ताने प्रबोधन काव्यगंध समाज परिवर्तनाचे निमंत्रित आणि उपस्थितांचे कवी संमेलन होणार असून प्रेक्षक रसिक श्रोत्यांना प्रवेश विनामूल्य आहे .




---

## रस्त्यासाठी रामगिरीवाडीकरांचे आमरण उपोषण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

स्वातंत्र्याच्या 78 वर्षात रामगिरी वाडी पोस्ट पिंपळनेर तालुका शिरूर कासार ही वाडी रस्त्यापासून वंचित आहे . 750 लोक वस्ती असलेली ही वाडी डोंगराच्या पायथ्याशी वसलेली आहे . सिंदफणानदीच्या तीरावर असल्यामुळे पावसाळयामध्ये या वाडीतील मुलं शिक्षणापासून वंचित राहतात . या वाडीत जायला गोमळवाडा हे गाव जवळ आहे परंतु गोमळवाडा आणि रामगिरवाडी यांच्यामधील सिंदफणा नदीचे पात्र रुंद असल्यामुळे आजतागायत रस्ता झालेला नाही . दोन वर्षांपूर्वी नाम फाउंडेशन व गावकऱ्यांच्या लोकवर्गणीच्या माध्यमातून नदीचे खोलीकरण करून वडाचीवाडी ते रामगिरी वाडी असा रस्ता बनविण्यात आला होता परंतु तो संपूर्ण रस्ता यावर्षीच्या पुलामध्ये वाहून गेला आहे त्यामुळे रामगीर वाडीला आजही दोन चाकी चार चाकी कोणतीही गाडी जात नाही पिंपळनेर हे गाव तस महसुली मध्ये



आहे परंतु त्या गावचा रामगिरी वाडीला काहीही उपयोग होत नाही . पिंपळनेर वरून रामगिरी वाडीला येणारे पांदण रस्ते सर्व शेतकऱ्यांनी बंद करून टाकलेले आहेत , याकडे सुद्धा गावातील मंडळींच दुर्लक्ष आहे . त्यामुळे सर्व जनतेशी या वाडीतील लोकांचा संपर्क तुटलेला आहे . आबालवृद्धांचे प्रचंड हाल चालू आहेत . दोन-तीन दिवसांपूर्वीच बबीताबाई महादेव बारगजे यांचं उपचार न मिळाल्यामुळे दुःखद निधन झाले . प्रशासन अजून किती मृत्यूची वाट पाहणार आहे . त्यामुळे प्रशासनाने तातडीने पावले उचलून रामगिरी वाडीतील रस्त्याचा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी समस्त रामगीरवाडीकरांनी केली आहे . या रस्त्याच्या मागणीसाठी रामगिरी वाडीतील समस्त तरुण पुरुष वर्ग गोमळवाडा जवळील पुलावर उपोषणास बसलेले आहेत याची शासनाने तातडीने दखल घ्यावी .

रामगिरी वाडीचे अपंग असलेले श्री संदिपान बारगजे पांडुरंग बारगजे अविनाश बारगजे दिनकर बारगजे ग्रामपंचायत सदस्य मनोज बारगजे सह अनेक गावकरी उपोषणास बसलेले आहेत .

या उपोषणास पिंपळनेरचे सरपंच मिठू दादा जायभाय गोमळवाडा गावचे माजी सरपंच सुदाम काकडे सामाजिक कार्यकर्ते आजिनाथ गवळी डॉक्टर उदय बारगजे सह संपूर्ण गावकर्यांनी संपूर्ण पाठिंबा दिलेला आहे .

---

## इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन व सहकर्म सामाजिक कल्याण फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२५' सोहळा संपन्न!

**दैनिक युवक आधार**
**कल्याण प्रतिनिधी - गुरुनाथ तिरपणकर**

समाजसेवा, शिक्षण, कला आणि विविध सामाजिक क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना सन्मानित करण्यासाठी इंडियन कॉपीराइट प्रोटेक्शन व सहकर्म सामाजिक कल्याण फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२५' सोहळा ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथील अग्रवाल कॉलेज येथे दिनांक ५ ऑक्टोबर २०२५ रोजी थाटात संपन्न झाला.

१३८ समाजसेवकांचा सन्मान करण्यात आला.



या प्रतिष्ठित सोहळ्याचे आयोजन इंडियन कॉपीराइट प्रोटेक्शनचे मुख्य तपासी अधिकारी रामजीत उर्फ जितू गुप्ता आणि सहकर्म सामाजिक कल्याण फाउंडेशनच्या शितल पाटील यांनी केले होते. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांतून समाजसेवक, शिक्षक, कलावंत आणि विविध सामाजिक कार्यात कार्यरत असलेले मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते. यावेळी, १३८ समाजसेवकांना त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल आकर्षक ट्रॉफी आणि सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले.

**दिग्गज मान्यवरांची उपस्थिती**

पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी अनेक दिग्गज मान्यवरांची उपस्थिती लाभली. यामध्ये इंडियन आर्मीचे सुभेदार कॅप्टन महेंद्र गवई सर, एडिशनल कमिशनर जी.एस.टी पुणे साळुंखे सर, हिंदू रक्षक संदीप शर्मा सर, शकुंतला तायडे मॅडम, उद्योजिका सुमित्रा पाटील मॅडम, अभिनेत्री साक्षी नाईक, विजय वाघेला सर, काजल सुर्वे मॅडम, समाजसेविका मेहरुजीम खान मॅडम, व डॉ. अनिता गुप्ता यांचा समावेश होता. या सर्व पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

---

## आमगाव पोलिसांची मोठी कारवाई!
### एका आरोपीकडून १५ मोटारसायकली जप्त; १४.९५ लाखांचा मुद्देमाल हस्तगत



**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी**

**आमगाव (गोंदिया):** आमगाव पोलिसांनी मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांमध्ये मोठी कारवाई करत एका आरोपीकडून तब्बल पंधरा मोटारसायकली (Motorcycles) जप्त केल्या आहेत. जप्त करण्यात आलेल्या या सर्व वाहनांची अंदाजे किंमत १४,९५,०००/- रुपये (चौदा लाख पंच्याण्णव हजार रुपये) आहे.

पोलीस निरीक्षक श्री. तिरुपती अशोक राणे यांच्या आदेशाने, आमगाव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने २८ सप्टेंबर २०२५ ते ०३ ऑक्टोबर २०२५ या दरम्यान ही प्रभावी कारवाई केली.

**कारवाईचा तपशील**

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पथकाने आमगाव तालुक्यातील कवडी, वडद, तिगाव, बघेडा (मांडोदेवी देवस्थान परिसर) या गावांमधील तसेच जंगल परिसरात तपास केला. या तपासणीदरम्यान चोरीच्या १५ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या.

**जप्त केलेल्या प्रमुख मोटारसायकलींचा तपशील:**

Royal Enfield Classic (सिल्वर/काळ्या रंगाची) - २ मोटारसायकली (प्रत्येकी किंमत अंदाजे ₹२,५०,०००/-)

Honda Shine/CB-Shine/Shine 125 (काळ्या रंगाची) - ३ मोटारसायकली (किंमत अंदाजे ₹८५,०००/- ते ₹९०,०००/-)

Hero Super Splender - ३ मोटारसायकली (किंमत अंदाजे ₹९०,०००/-)

Honda Dream Neo/Yuga - ४ मोटारसायकली (किंमत अंदाजे ₹५०,०००/- ते ₹८५,०००/-)

TVS Rider (काळ्या रंगाची) - १ मोटारसायकल (किंमत अंदाजे ₹१,००,०००/-)

इतर वाहने: Hero CD-Deluxe आणि Hero Passion Pro.

**आरोपी ताब्यात**

याप्रकरणी पोलिसांनी मिथुन ईश्वरगिरी रिधनार्थी (वय २७, रा. कवडी, ता. आमगाव, जि. गोंदिया) या आरोपीला ताब्यात घेतले आहे. त्याच्याविरुद्ध आमगाव पोलीस स्टेशन येथे पो.स्टे. अप क्रं. ७२९/२०२४ कलम ३०३ (२), ३ (५) भा. न्या. संहीता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपी सध्या पोलीस कोठडी रिमांडमध्ये असून, पोउपनि चव्हाण या गुन्ह्याचा तपास करत आहेत. आरोपीच्या दुसऱ्या साथीदाराचा शोध पोलीस घेत आहेत.

**पोलीस पथकाचे कौतुक**

गोंदिया जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक श्री. गोरख भामरे आणि अपर पोलीस अधिक्षक श्री अभय डोंगरे (कॅम्प देवरी) यांच्या निर्देशानुसार, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. प्रमोद मडामे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. तिरुपती राणे (पोलीस ठाणे आमगाव) यांनी ही कारवाई यशस्वी केली.

या कामगिरीमध्ये पोउपनि सागर चव्हाण, पोहवा दुधराम मेश्राम, पोहवा मन्यार, पोहवा राजु गजपुरे, पोशि विनोद उपराडे, चेतन शेंडे, मिलनसिंग मंजुटे, नितीन चोपकर, पोशि भागवत कोडापे, पोशि दिनेश वानखडे, पोशि अजय इंगळे आणि पोशि शहारे यांनी सक्रिय सहभाग घेतला. या यशस्वी कामगिरीबद्दल पोलीस दलातर्फे पथकाचे कौतुक होत आहे.

पोलिसांकडून आवाहन: नागरिकांनी आपली वाहने सुरक्षित ठिकाणी पार्क करावीत आणि चोरी झाल्यास तात्काळ पोलिसांना कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

## बंजारा ,धनगर ,इतर अनेक जातींनी आदिवासींमध्ये होत असलेल्या घुसखोरी विरोधात विशाल आक्रोश मोर्चाने भंडारा येथे आदिवासींच्या मोर्चाने शासनाला भरली धडकी

**मोर्चात हजारोच्या संख्येने आदिवासी बांधव सामील, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पोलिसांचे छावणीचे स्वरूप**

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे महाराष्ट्र**

भंडारा आज दिनांक 6 ऑक्टोबर 2025 ला दसरा मैदान शास्त्री चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा येथे संयुक्त आदिवासी कृती समिती जिल्हा भंडाऱ्याच्या वतीने निघालेल्या आदिवासींच्या मोर्चाने शासनाला धडकी भरली असून या मोर्चामध्ये हजारो आदिवासी बांधव, भगिनी हजारोंच्या संख्येने उपस्थित झाल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाला पोलीस छावणीचे स्वरूप प्राप्त झाले होते. त्यानंतर या मोर्चाचे एका सभेमध्ये रूपांतर झाले. सदर मोर्चा बंजारा ,धनगर ,इतर अनेक जातींनी आदिवासी समाजांमध्ये होत असलेल्या घुसखोरी विरोधात या मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले होते. काढण्यात आलेल्या आदिवासींच्या मोर्चातील प्रमुख मागण्यांमध्ये बंजारा व इतर कोणत्याही जातीला अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश घेण्यात येऊ



नये, छोट्या संवर्गातील बिंदू नामावली अनुसूचित जमातीचा बिंदू पूर्ववत क्रमांक 2 ठेवण्यात यावे, राज्यातील अनुसूचित जमातीचा अनुशेष तात्काळ भरण्यात यावा ,आदिवासी विभागाअंतर्गत वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना दिली जाणारी डीबीटी योजना बंद करून शासकीय खानावळ सुरू करण्यात यावी, आदिवासींच्या जमिनी गैर आदिवासींना भाडेतत्त्वावर देण्यात येऊ नये, शैक्षणिक किंवा इतर क्षेत्रांमध्ये जात वैधता प्रमाणपत्राशिवाय कोणतेही लाभ देण्यात येऊ नये ,भंडारा जिल्ह्यामध्ये पेसा कायदा लागू करण्यात यावा ,सर्वोच्च न्यायालयाने दिनांक 6 जुलै 2017 रोजी गैर आदिवासी विरोधात दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करून अधिसंखे झालेल्या १२५०० पदावर खरे आदिवासींचे पद भरती करण्यात यावी ,9 ऑगस्ट जागतिक आदिवासी दिवशी शासनाकडून महिला आदिवासी राणी दुर्गावती सबलीकरण किंवा इतर कोणतेही कार्यक्रम घेण्यात येऊ नये ,आदिवासी समाजातील महापुरुषांचा इतिहास शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात यावा ,इत्यादी मागण्यांकरिता सदर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. सदर मोर्चामध्ये ऑल इंडिया आदिवासी अप्लाईज फेडरेशन, नॅशनल आदिवासी पीपल्स फेडरेशन, नॅशनल ,आदिवासी महिला फेडरेशन, आर्गेनायझेशन फार राईट्स ऑफ ट्रायबल ,आदिवासी हलबा/ हलबी कर्मचारी महासंघ आदिवासी विद्यार्थी संघ, बिरसा मुंडा फाइटर ,अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, गोंडवाना गणतंत्र पार्टी ,आदिवासी बचाव आंदोलन राणी दुर्गावती सेवा समिती, क्रांतीसुर्य बिरसा मुंडा स्मारक समिती व अन्य आदिवासी संघटना ,सेंटर प्रोव्हिन्स जिल्हा भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने सदर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलिसांचा चोख बंदोबस्त होता.